# प्रकरण तीन

## कृषी विभाग

**3.605 आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत 3 एच.पी.पेट्रोस्टट डिझेल रन पंपसेट (इंजिन) पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8)** - सदर योजनेवर सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद, ठाणे यांनी महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचेकडून 3 एच.पी. पेट्रोस्टट डिझेल रन पंपसेट (इंजिन) खरेदीवर रक्कम रूपये 1,12,86,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 प्रमाणे वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी केली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्यात दर्जा व गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534 दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

4) मार्गदर्शक सुचनेनुसार पंचायत समितीकडील लाभार्थ्यांचे प्रस्ताव नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 90 व 91 अन्वये खरेदी आदेश, प्राप्त चलन क्रमांक, बॅच नंबर, खरेदी किंमत, प्राप्त दिनांक, वाटप दिनांक व देणाऱ्याची सही घेणे आवश्यक असताना वसई, डहाणू, वाडा, पालघर, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, शहापूर गटाची ओटीएसपी योजनेची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

6) उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

7) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र.14/कोषा-4,दिनांक 11/02/2000 व संकीर्ण-1007/प्रक्र.27/कोषा.प्र-5,दिनांक 20/03/2007 अन्वये दिनांक 15 फेब्रुवारी नंतर कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येऊ नये असे आदेश असतांना 15 फेब्रुवारी नंतर खरेदी करण्यात आली असल्याने शासन आदेशाचे पालन केलेले नाही.

**3.606 आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत भातमळणी यंत्र पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10)** - सदर योजनेवर सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद ठाणे यांनी महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचेकडून भातमळणी यंत्र खरेदीवर रक्कम रूपये 90,52,500/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र दिले नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534,दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असताना मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

4) मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध करणे आवश्यक असतांना ते उपलब्ध केलेले नाहीत.

5) साहित्याचा वापर लाभार्थी करत असलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करणे आवश्यक असताना उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध केले नाही.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र.14/कोषा-4, दिनांक 11/02/2000 व संकीर्ण-1007/प्रक्र.27/कोषा.प्र-5, दिनांक 20/03/2007 अन्वये दिनांक 15 फेब्रुवारी नंतर कोणत्याही प्रकारची खरेदी करण्यात येऊ नये असे आदेश असतांना 15 फेब्रुवारी नंतर खरेदी करण्यात आली असल्याने शासन आदेशाचे पालन केलेले नाही.

**3.607 50 टक्के अनुदानावर ताडपत्रीचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17)** - सदर योजनेवर सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद, ठाणे यांनी मे. लॅमिकॅब्ज अँड पेपर्स प्रा. लि.,ए-14/2, एम.आय.डी.सी. ची इंडस्ट्रीयल एरीया, चिखलठाणा, औरंगाबाद यांचेकडून ताडपत्री खरेदीवर रक्कम रूपये 1,00,99,440/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुंबई मुद्रांक (सुधारणा अधिनियम) 2006 कलम 66 नुसार दहा लाखापर्यंतच्या करारनाम्यातील रुपये 100/- किमतीच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करावा व त्या पुढील प्रत्येक लाखाकरीता रुपये 100/- प्रमाणे मुद्रांक लावणे आवश्यक आहे व पुरवठा आदेश देण्याअगोदर करारनामा करणे आवश्यक असतांना मुद्रांकित करारनामा पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकालाच केला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील “परिशिष्ट-इ” योजना वेळापत्रकानुसार राबविली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे साहित्याचा दर्जा व गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र दिले नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/2013 नुसार संबंधीत वित्तीय वर्षातच साहित्याची खरेदी व वाटप करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.

5) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 4 अन्वये साहित्य साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करणे आवश्यक असतांना ते उपलब्ध केले नाही.

6) करारनाम्यातील अटी व शर्ती क्रमांक 2 नुसार आयकराची रक्कम वसुल केलेली नाही.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/1089/846/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार साहित्याचे वाटप वेळेत झालेले नसल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**3.608 जिल्हा परिषद उपकर निधीतून शेतकऱ्यांसाठी 75 टक्के अनुदानावर सौर कंदिल पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद उपकर निधीमधून शेतक-यांसाठी 75 टक्के अनुदानावर सौर कंदिल पुरवठा करणे बाबत या योजनेसाठी अंदाजपत्रकिय तरतुद रक्कम रूपये 5,00,000/- असून त्यासाठी रक्कम रूपये 4,99,538/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अंतीम मार्गदर्शन सुचना दिनांक 02/06/2014 मधील अ.क्र.5 नुसार योजनेची माहिती सर्व शेतकऱ्यांना दिले बाबतचे कागदपत्रे नस्तीसोबत जोडले नाहीत.

2) सदर योजनेसाठी जिल्हयातून किती शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले याबाबतची नोंदवही ठेवणेंत आली नाही. त्याचप्रमाणे योजनेस व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थ्यांच्या निवडीबाबत. ग्रामसभेत अवगत केले नाही.

3) एकूण 385 सौर कंदिल गट निहाय वाटप केलेले आहे. गटातून किती लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिलेला आहे. तसेच प्रत्येक गटातून जिल्हा निवड समितीकडे किती लाभार्थ्यांची यादी पाठविली व किती लाभार्थी मंजूर झाले याबाबतची माहिती नस्ती सोबत नाही.

4) सन 2012-13 ते 2013-14 मध्ये लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी जिल्हा परिषद कार्यालयात लावणे आवश्यक होते, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखे नस्तीसोबत नाही.

5) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पंरास/1084/आरसी/1623,दिनांक 1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम वसूल केल्याशिवाय योजना कार्यान्वीत करू नये असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांना देखील 25% लाभार्थीचा हिस्सा रक्कम रूपये 1,66,512/- इतकी रक्कम वसूल न करता खर्च केलेली आहे. तरी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून रक्कम रूपये 1,66,512/- इतकी रक्कम वसूलात आणावी.

6) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-09,दिनांक 20/06/2008 नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यक्रम राबविणे सदर्भात शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. तथापि सदर परिपत्रकानुसार कार्यवाही केलेली नसल्याचे लेखापरिक्षणास निदर्शनास आले आहे.

7) शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन,व दुग्धव्यवसाय विभाग, क्रमांक विधयो-1608/प्र.क्र.100/4 ए/ दिनांक 13/10/2008 मधील अ.क्र.10 नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून केलेले नाही.

8) खरेदी केलेल्या साहित्याची शासन निर्णय उदयोग,उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई क्रमांक भाखस-1088/2512/उदयोग-06,दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ठ 8 नुसार साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावरच उर्वरीत 10 टक्के रक्कम अदा करावयाची होती परंतू त्यानुसार कार्यवाही केली नाही.

9) सौर कंदिल वाटप केलेल्या डीलीव्हरी चलनावर साहित्य प्राप्त करणाऱ्या अधीकाऱ्यांची दिनांकित स्वाक्षरी नसल्याने पुरवठा आदेशामधील मुदतीत साहीत्य प्राप्त झाले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

**3.609 जिल्हा परिषद उपकर निधीतून शेतकऱ्यांसाठी 75 टक्के अनुदानावर सौर उर्जेवर चालणारे घरघुती दिपसंच पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद उपकर निधीमधून शेतक-यांसाठी 75 टक्के अनुदानावर सौर उर्जेवर चालणारे घरघुती दिपसंच पुरवठा करणेसाठी अंदाजपत्रकिय तरतुद रक्कम रुपये 15,00,000/- आहे. व सदर योजनेवर रक्कम रूपये 14,94,000/- इतका खर्च झालेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांची अंतिम मार्गदर्शक सुचना दिनांक 02/06/2014 मधील अ.क्र.5 नुसार योजनेची व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही केल्याबाबतचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

2) जिल्हयातून किती शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले याची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

3) योजनेस व्यापक प्रसिध्दी दिलेली नाही, त्याप्रमाणे लाभार्थी निवडीची विहीत कार्यपध्दती अवलंबन केल्याबाबतचे लेखे उपलब्ध झाले नाहीत त्याप्रमाणे लाभार्थी मंजूर बाबत माहिती उपलब्ध नाही.

4) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार कार्यकंत्राट नमुद केलेली रक्कम रूपये 10,00,000/- पर्यंत रूपये 100/- मुद्रांक शुल्क व रूपये 10,00,000/- लाखा पेक्षा जास्त असेल तेव्हा रूपये 10,00,000/- लाखा पुढील प्रत्येकी रूपये 1,00,000/- लाखासाठी रूपये 100/- प्रमाणे आकारणी आवश्यक आहे. सदर योजनेची रक्कम रूपये 14,94,000/- इतकी खरेदी केलेली आहे. म्हणजे रूपये 600/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास/1084/आर.सी./1633 दिनांक 1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम वसूल केल्याशिवाय योजना कार्यान्वीत करू नये असे स्पष्ट निर्देश दिलेले असतांना व सदर योजनेतील 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 4,98,000/- वसूल न करता योजना कार्यान्वीत केलेली आहे. तरी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून रक्कम रूपये 4,98,000/- वसूलात आणावी.

6) योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत केले नाही. सन 2012-13 व 2013-14 मध्ये लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी जिल्हा परिषद कार्यालयात लावली नाही.

7) शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग दिनांक 20/6/2008 योजनेचा लाभ लाभार्थ्यांस त्याच वित्तीय वर्षात देण्यात आला नाही.

8) शासननिर्णय 02/01/1992 मधील परिशीष्ट 8 नुसार साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावरच उर्वरीत 10 टक्के रक्कम अदा करावयाची होती, परंतू त्यानुसार कार्यवाही केली नाही.

9) सौर उर्जेवर चालणारे घरघुती दिपसंच वाटप केलेल्या डिलीव्हरी चलनावर साहित्य प्राप्त करणाऱ्या अधीकाऱ्याच्या दिनांकित स्वाक्षरी नसल्याने पुरवठा आदेशात नमुद मुदतीत साहित्य प्राप्त झाले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

10) महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक दिनांक 11/2/2000 नुसार 15 फेब्रूवारी नंतर प्रशासकीय विभागाने कोणतीही खरेदी करू नये अश्या स्पष्ट सुचना असतांना देखील निधी उपलब्ध आहे या कारणास्तव अनावश्यक खर्च केला आहे.

**3.610 घरगुती सौर दिपसंच 75 टक्के अनुदानाने शेतकऱ्यांना पुरवठा करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद कृषी विभागाने जिल्हा परिषद निधीतून अपारंपारीक उर्जा विकास कार्यक्रमांतर्गत घरघुती सौरदिपसंच शेतकऱ्यांना पुरवठा करण्याबाबतच्या योजनेवर एकूण 99,97,350/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेला व्यापक प्रसिध्दी दिल्याचे लेखे उपलब्ध झाले नाही.

2) सदर योजनेला किती लाभार्थ्यांचे अर्ज आले त्याची नोंदवही ठेवली नाही. व अटी शर्तीचे पालन केले नाही.

3) लाभार्थ्यांची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून केले नाही.

5) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार कमी भरलेले मुद्रांक शुल्क् रुपये 9,100/- वसूल करावे. शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास/1084/आरसी/1633,दिनांक 1985 नुसार लाभार्थी हिस्याची रक्कम वसूल केल्याशीवाय योजना कार्यान्वीत करू नये असे स्पष्ट निर्देश असतांना देखील सदर योजना कार्यान्वीत केलेली आहे. त्यामूळे सदर योजनेतील 25 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 33,32,450/- वसूल करावी.

6) शासन निर्णय उदयोग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई क्रमांक 1088 दिनांक 02/01/1992 मधील परिशीष्ट 8 व दर कराराच्या अटीनुसार साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्याशीवाय 10 टक्के रक्कम अदा करू नये असे नमुद असतांना पुर्ण रक्कम प्रदान केल्याचे दिसून येते.

7) चाचणी अहवाल नस्तीस उपलब्ध नाही.

8) डिलीव्हरी चलनावर दिनांकित स्वाक्षरी नाही. त्यामूळे पुरवठा आदेशात नमुद मुदतीत साहित्य प्राप्त झाले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

9) योजनेचे मुल्यमापन हे त्रयस्थ संस्थेकडून करण्यात आले नाही.

**3.611 50 टक्के अनुदानाचे पिक संरक्षण औषधांचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद रायगड यांनी जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत 50% अनुदानावर शेतकऱ्यांना पिक संरक्षण औषधांचा पुरवठा करण्यासाठी एकूण रूपये 8,95,415/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मंजूरी दिनांक 21/06/2014 ची असतांना संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश दिनांक 05/06/2014 रोजी दिलेला आहे. म्हणजे पुरवठा आदेश दिल्यानंतर प्रशासकिय व तांत्रित मंजूरी घेण्यात आलेली आहे.

2) कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे दिनांक 22/05/2014 च्या परिपत्रकामध्ये सुचीत केल्याप्रमाणे शासकिय किटक नाशक औषधांची चाचणी करून सदरची औषधे खरेदी करण्याबाबत स्पष्ट सुचना आहेत परंतू त्याप्रमाणे त्यांचेकडून चाचणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आलेले नाही.

3) लाभार्थ्यांना पुरवठा केलेल्या औषधांचा 50 टक्के लाभार्थी हिस्याची काही गटाकडून रक्कम रूपये 83,894/- इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे.

4) अलिबाग,पनवेल,खालापूर,तळा या तालुक्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झालेले नाहीत.

5) साठानोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामूळे सदर औषध प्राप्त झाल्याचे आणि संबंधितांना हस्तांतरीत केल्याबाबतच्या स्वाक्षरीसह नोंदी आढळल्या नाही त्यामूळे प्रत्यक्षात विनियोग किती झाला? याची लेखापरिक्षणात खातरजमा करता आली नाही.

**3.612 जिल्हा परिषद उपकर निधीतून 50 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** जिल्हा परिषद कृषी विभागाने 50 टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे योजनेवर एकूण 48,98,476/- खर्च केलेला आहे.

1) सदर योजनेला व्यापक प्रसिध्दी दिल्याचे लेखे उपलब्ध झाले नाही.

2) सदर योजनेला किती लाभार्थ्यांचे अर्ज आले त्याची नोंदवही ठेवली नाही. व अटी शर्तीचे पालन केले नाही.

3) लाभार्थ्यांची माहिती नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

4) योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून केले नाही.

5) मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार कमी भरलेले मुद्रांक शुल्क् रुपये 3,900/- वसूल करावी.

6) योजनेतील अटीनुसार 50 टक्के लाभार्थी हिस्सा वसूल केलेला नाही.

7) शासन निर्णय 2/01/1992 मधील परिशीष्ट 8 नुसार व दरकरारातील अटीनुसार पुरवठा केलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल नस्तीसोबत नसतांनाही 10% रक्कम राखून न ठेवता पुर्ण रक्कम प्रदान केल्याचे दिसून येते.

8) दिनांक 27/06/2014 व 09/03/2017 अन्वये पुरवठा आदेश देण्यात आले परंतू पुरवठा आदेशाच्या मुदतीत साहीत्य प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही. कारण डिलीव्हरी चलनावर साहित्य प्राप्त करणाऱ्या अधीकाऱ्याची दिनांकित स्वाक्षरी नाही.

9) सन 2012-13 ते 2013-14 मध्ये लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी जिल्हा परिषद कार्यालयात लावण्यात आली नाही.

**3.613 राष्ट्रीय बायोगॅस योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत कृषि विभागाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षासाठी राष्ट्रीय बायोगॅस योजनेसाठी तरतूद रक्कम रुपये 29,02,018/- केलेली असून सदर योजनेवर रक्कम रुपये 29,02,018/- इतका खर्च आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) "विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन विशा/कार्या-6/यो-1/ बायोगॅस/2014,दिनांक 04/08/2014 " अन्वये रत्नागिरीसाठी सर्वसाधारण 235, अनुसूचित जातींसाठी 15 असे एकूण 250 जणांसाठी बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. प्रत्येक तालुक्याला लक्षांक देण्यात आले होते. त्याप्रमाणे खेड तालुक्यासाठी 30 संयंत्राचे लक्षांक दिलेले असतांना 28 उद्दिष्ट साध्य केले असून, लांजा तालुक्यासाठी 24 संयंत्राचे लक्षांक दिलेले असतांना 26 उद्दिष्ठ साध्य केलेले आहे. तरी कमी व जादा झालेल्या उद्दिष्टाबाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

2) प्रत्येक तिमाहीत उभारलेल्या प्रत्येक संयंत्राची तपासणी करुन तसे प्रमाणपत्र सक्षम प्राधिका-याने लेखा परिक्षणासाठी देण्याची आवश्यकता आहे.

3) लेख्यांअभावी मान्यताप्राप्त संयंत्राचीच उभारणी केली आहे किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

4) लांजा तालुक्याच्या गटविकास अधिका-यांचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखा परिक्षणास प्राप्त झाले नाही.

5) कृषि विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी टर्न की फी व सेवाशुल्क यासाठी रक्कम रुपये 3,75,000/- व 30,018/- अशी एकूण रक्कम रुपये 4,05,018/- मुख्यालयी स्वत:च्या खाती जमा करुन ठेवलेली आहे. परंतु उपरोक्त शासन निर्णयानुसार टर्न की फी ही पाच हप्त्यात रक्कम रुपये 1,500/- टर्न की वर्कर अथवा स्वयंसेवी संस्थांना अदा करावयाची आहे.

**3.614 विशेष घटक योजना पाईप लाईन खरेदी.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत कृषि विभागाने सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत पाईप लाईन खरेदी करण्याकरिता सदर योजनेंतर्गत महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, उत्पादक मारु केमिकल्स इंडस्ट्रीज, मालेगाव यांचेकडून एकूण रुपये 51,00,910/- किंमतीचे एकूण 10,853 नग 75 एम.एम होज पाईप खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा केलेले पाईप आय.एस.आय मानांकन असलेचे प्रमाणपत्र सोबत आढळले नाही. आय.एस.आय मानांकन नसल्यास त्रयस्थ संस्थेकडून पाईपच्या दर्जाची तपासणी करुन त्याचा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. तथापि, त्याबाबतचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

2) पुरवठादाराबरोबर करारनामा केलेला नाही.

3) प्रदान केलेल्या रक्कमेवर 2 टक्के आयकर व 0.30 टक्के शिक्षण उपकर भरणा केल्याची चलने देयकासोबत आढळली नाहीत.

**3.615 सुधारित कृषि अवजारे 50 टक्के अनुदानावर पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत कृषि विभागाने सन 2014-2015 या आर्थिक वर्षात कृषि अवजारे खरेदी करण्याकरिता एकूण रक्कम रुपये 23,96,465/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1094/सी.आर. 5633, दिनांक 19/10/1985 तसेच, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-पंरास/1099/प्र.क्र.78/05,दिनांक 09/01/2007 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे योजना राबविण्यापुर्वी आणि साहित्य खरेदी करण्यापुर्वी प्रथम लाभार्थी निवड करुन त्यांचेकडून लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक- झेडपीए/ 2000/ प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना पाळावयाच्या वेळापत्रकाबाबत स्पष्टपणे आदेश दिलेले असतांना त्यानुसार 8 जानेवारी पर्यंतच्या मुदतीत साहित्य वाटप होण्याची कार्यवाही झालेली नाही.

3) पुरवठा आदेशानुसार दापोली तालुक्यात 550 नग प्लास्टिक क्रेट पुरवठा दिनांक 22/05/2015 रोजी झालेला आहे. पुरवठा आदेश दिनांक 24/03/2015 रोजीचा असतांना 2 महिने विलंबाने पुरवठा झालेला आहे. पुरवठा आदेशात 15 दिवसांची मुदत आहे. तरी पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार प्रति आठवडा प्रमाणे 0.05 टक्के ते 10 टक्के पर्यंत दंड आकारण्याची तरतूद असतांना संबंधितांवर विलंबाने पुरवठा केल्याबाबत योग्य तो दंड आकारण्याची कार्यवाही केलेली नाही.

4) पंचायत समिती रत्नागिरीला दिनांक 01/06/2015 रोजी 400 नग प्लास्टिक क्रेट पुरवठा जवळपास दोन महिन्यांपेक्षा जादा कालावधीने विलंबाने करण्यात आला आहे. विलंबाने पुरवठा झाल्याबाबत संबंधितांवर योग्य ती दंडात्मक कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

5) प्रत्येक तालुक्याने सादर केलेल्या डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही. तसेच, सदर अवजारांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात आल्या असून त्याला जावक क्रमांक व दिनांक नमूद केलेला नाही.

**3.616 सिंचन सुविधा निर्माण करणे योजनेतील अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** कृषि विभागाच्या सन 2014-2015 च्या लेखापरिक्षणाचे वेळी सिंचन सुविधा निर्माण करणे योजनेचे लेखे तपासले असता खाली नमुद केल्याप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) विभागाने डिझेल इंजिन व विदयुत पंप खरेदी करण्यापूर्वी पंचायत समिती गटनिहाय शेतक-यांना लागणा-या डिझेल इंजिन व विदयुतपंपाची मागणी निश्चित न केल्याने आवश्यकतेनुसारच डिझेल इंजिन अणि विदयुतपंपाची खरेदी केल्याबाबत खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्र.क्र.446/दिनांक 20/6/2008 नुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रकाचे पालन केले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 प्रमाणे रक्कम प्रदान केल्यानंतर बिलाचा दुबार वापर होणार नाही म्हणून बिले विरुपीत केलेली नाही.

4) लाभार्थींची निवड यादी आणि योजना मुल्यमापन अहवाल लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झालेले नाहीत.

5) डिझेल इंजिन आणि विदयुत पंप गटस्तरावर पोहोच केलेबाबत डिलिव्हरी चलनावर दिनांकासहित पोहोच नाही. त्यामुळे खरेदी केलेले साहित्य वेळेत पोहोच केलेबाबत खात्री करता आली नाही.

**3.617 एससीपी / टीएसपी / ओटीएसपी अंतर्गत 100 टक्के अनुदान योजनेमधील साहित्य लेखा परीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक असलेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** कृषि विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात एससीपी / टीएसपी / ओटीएसपी अंतर्गत 100 टक्के अनुदान योजनेमधील साहित्य लेखा परीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक असलेचे आढळुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती नाशिक, यांचेकडील साठा नोंदवहीची तपासणी केली असता मुळ अहवालात नमुद एकूण 1 ते 16 प्रकारचे साहित्य लेखा परीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक असल्याचे आढळून आले. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर साहित्याचा लाभ देण्यात येतो. म्हणजेच गरजू लाभार्थ्यांची निवड सदर योजनेसाठी करणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे मोठया प्रमाणावर साहित्य शिल्लक राहणे याचाच अर्थ लाभार्थ्यांची निवड योग्य प्रकारे केली नसल्याचे दिसून येते. तसेच शासनाची मोठया प्रमाणावर रक्कम अनाठायी गुंतून पडते याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.618 जिल्हा परिषद सेस निधीतून 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण उपकरणे (हायटे स्प्रेपंप) पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद सेस निधीतून 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण उपकरणे (हायटेक स्प्रेपंप) पुरवठा करणेबाबत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेच्या कृषी समितीने लाभार्थी निवड यादीस मंजूरी दिल्याबाबतची प्रत नस्तीत जोडण्यात आलेली नाही.

2) पुरवठा करण्यात येणारी यंत्राची आय. एस. आय प्रमाणपत्राची प्रत कृषी .विकास अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांना आलेली नाही.

3) प्रमाणक क्रमांक 51,दिनांक 09/09/2014 नुसार 1962 नग हायटेक स्प्रेपंपाचा पुरवठा करण्यात आलेला असून प्रमाणक क्रमांक 282,दिनांक 31/03/2015 नुसार पुन्हा 170 नग स्प्रेपंपाची खरेदी करण्यात आलेली आढळून आली. सदर खरेदीबाबत दिनांक 23/03/2015 रोजी ठराव करुन दिनांक 31/03/2015 रोजी पुरवठा आदेश देण्यात

आलेला आहे व त्याच दिवशी खरेदीचे उपप्रमाणक नस्ती सोबत आढळून आले. दिनांक 31/03/2015 रोजी पुरवठा आदेश देवून त्याच दिवशी साहित्याचा पुरवठा पंचायत समितींना मागणी नसतांना केवळ रक्कम खर्ची घालण्याच्या हेतूने करण्यात आल्याचे स्पष्ट होते.

4) प्रमाणक क्रमांक 282,दिनांक 31/03/2015 नुसार खरेदी साहित्यासाठी जिल्हा परिषद सेस मधून शेतकरी सन्मानासाठी करणेत आलेली तरतूद रुपये 1.00/- लाख व इतर योजनेतील अखर्चित रक्कम रुपये 8,000/- खर्च करण्यात आली. शेतकरी सन्मानासाठी इतरही योजना जिल्हा परिषदेस राबविता आल्या असत्या परंतु याबाबत सन 2014-15 या आर्थीक वर्षात कोणतीही ठोस कार्यवाही नकरता वर्षअखेरीस घाईत सदर रक्कम स्प्रेपंप खरेदीवर खर्च करण्यात आली. याअर्थी नियोजनपूर्वक योजना राबविणेबाबत कार्यवाही केल्याचे आढळून येते.

5) तसेच प्रमाणक क्रमांक 282,दिनांक 31/03/2015 नुसार खरेदी करण्यात आलेल्या स्प्रेपंपासाठी सुधारित तांत्रिक मंजूरी आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नसल्याने याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

6) हायटेक स्प्रेपंपाच्या खरेदी नगापैकी पहिल्या देयकातील एकूण नगापैकी 350 नग व दुसऱ्या देयाकतील एकूण नगापैकी 42 नग शिंदखेडा तालुक्यासाठी देण्यात आलेले होते. तालुका स्तरावरील वाटप नोंदवही नुसार 350 नगापैंकी 342 नगांचे वाटप झाले व 8 नग नादुरुस्त असून भांडारात शिल्लक असल्याचे दाखविण्यात आले व 42 नगापैकी 37 नगांचे वाटप झाले व 5 नग नादुरुस्त असून भांडारात शिल्लक असल्याचे दाखविण्यात आलेले आहे. नादुरुस्त नग पुरवठादाराकडे परत करण्यात येवून नविन चालू स्थितीतील नग पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात न आल्याने एकूण 13 नगसाठी प्रति नग रुपये 633/- प्रमाणे रुपये 8,229/- शासन अनुदानाचा अपव्यय झाला आहे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50 (4) लाभार्थी हिस्सा जमा केल्यानंतर तालुका स्तरावरुन पावत्या देण्यात आलेल्या नाहीत.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र घेतलेले नाही.

9) महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो/1204/प्र.क्र.284/16ए,दिनांक 13/08/2008 अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम 1995 व महाराष्ट्रातील अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) नियम 2001 नुसार कृषि विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनातंर्गत एकूण लाभधारक शेतकऱ्यांपैकी 3 टक्के अपंग शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देणेबाबत कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1094/सीआर 2239/37/67,दिनांक 01/03/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थींच्या स्थितीत काय सुधारणा झाली याचा अहवाल सादर केलेला नाही.

**3.619 जिल्हा परिषद सेस फंडातुन ताडपत्री पुरवठाबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद सेस फंडातुन ताडपत्री पुरवठा खरेदीचा खर्च रुपये 89,98,700/- केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नंदुरबार, नवापुर, शहादा, लाभार्थ्यांची निवड यादी नाही.

2) पंचायत समिती नंदुरबार यांना 1301 नग ताडपत्री वाटप न करता शिल्लक असल्याचे दिसुन आले.

3) पंचायत समिती तळोदा ताडपत्री 1123 पैकी 801 प्रकणे मंजुर केलेली आहेत.

4) पंचायत समिती शहादा ताडपत्री वाटप नोंदवहीवर संबंधितांच्या पोच नाहीत.

5) पंचायत समिती नवापुर ताडपत्री 1864 पैकी 1001 चे प्रस्ताव मंजुर केलेले आहेत, उर्वरीत लाभार्थ्याचे प्रस्ताव नाहीत.

6) पंचायत समिती धडगाव लाभार्थी यादी व प्रस्ताव पहावयास मिळाले नाहीत.

7) पंचायत समिती अक्कलकुवा ताडपत्री वाटप रजिस्टर पहावयास मिळाले नाही.

8) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र/446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक दिलेले आहे. त्यानुसार योजना विहीत कालमर्यादेत राबविलेली नाही.

**3.620 जिल्हा परिषद उपकरातुन शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** उपकरातुन शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी पोटी रक्कम रुपये 10,83,456/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ प्र.क.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रकानुसार योजना राबविली नाही.

2) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तिक लाभार्थी योजना, प्रथम लाभार्थी निश्चित करुन लोकसहभागाचा भरणा झाल्या नंतर राबविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) योजना सन 2014-2015 ची असतांना लाभ सन 2015-2016 मध्ये दिला शासन निर्णय दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविली नाही.

4) पंचायत समिती, जामनेर गटास साहित्य वाटप दिनांक 01/08/2015 रोजी व पंचायत समिती मुक्ताईनगर गटास दिनांक 08/09/2015 रोजी विलंबाने वाटप करण्यात आले.

**3.621 जिल्हा परिच्छेद सेस निधी योजना सन 2014-15 अंतर्गत शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर 3 HP कडबाकुट्टी यंत्र (मोटार विरहीत) नग संख्या 267 च्या पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगरचे सन 2014-15 या कालावधीत कडबाकुट्टी यंत्र 267 नग खरेदी केलेली आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीई 2008/प्र.क्र.446/ वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविताना दिनांक निहाय वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. परंतू पालन झालेले नाही.

2) लाभार्थी निवडीची प्रक्रिया न करता अंदाजांनी मागणी केल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/ 1084/जीआर 1633,दिनांक 19/01/1985 अन्वये लाभार्थी हिस्सा प्रथमत: वसुल करणे असतांना साहित्य वाटपाचे वेळी वसूल केलेला आहे व त्याप्रमाणे पुरवठादारास रक्कमा प्रदान केलेला आहे.

4) कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचना क्रमांक 282,दिनांक 19/12/2006 नुसार तसेच पुरवठा आदेशातील अट क्रमांक 11 नुसार पुरवठा करावयाचे साहित्याचे दराबाबत खुल्या बाजारात चौकशी करुन सदर दर अधिक नसल्याची खात्री केलेली नाही.

5) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार शासन मान्य संस्थाकडून मापदंड व गुणवत्तेबाबत नमूना तपासणी करणे असतांना केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1089 दिनांक 05/10/1989 मास्टर नोंदवही ठेवणे असतांना ठेवलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 29, दिनांक 12/10/2007 अन्वये 3टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ देणे असतांना दिलेला नाही.

8) रक्कम रुपये 2,500/- मुद्रांक स्टॅम्पवर करारनामा केलेला नाही. संबंधीत मक्तेदाराकडून रक्कम रूपये 2,500/- वसुल होणे आवश्यक आहे.

9) उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

10) दिनांक 31/3/2015 पावेतो 28 नग कडबाकुट्टी यंत्र शिल्लक आहेत, याबाबत खुलासा करावा.

**3.622 जिल्हा वार्षिक योजना मधून सौरप्रकल्प अंतर्गत ग्रामपंचायतींना सौर पथदिवे सयंत्र खरेदी करून अस्थापित करून देण्यामधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** कृषी विभाग जिल्हा वार्षिक योजना मधून शासन निधीतून सौरप्रकल्प अंतर्गत ग्रामपंचायतीना सौर पथदिवे सयंत्र खरेदी करुन अस्थापित करुन देण्याकरिता रक्कम रुपये 1,09,21,680/- इतका खर्च करण्यात आला असून त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांच्या दरकरारामध्ये बाब क्रं.5 Led based solar street व अ.क्रं.6 solar street light असे सौरपथदिवे सयंत्राचे प्रकार आहेत. तथापि, कोणत्या प्रकारचे सौरपथदिवे सयंत्र खरेदी करावे या बाबत तांत्रिक अधिका-याचे अभिप्राय घेण्यात आलेले नसताना खरेदी करण्यात आली.

2) महाऊर्जा, पुणे यांच्या सदर दरकरारामध्ये एकूण 85 सौरपथदिवे उत्पादक पुरवठादार समाविष्ठ असून त्यातील अ.क्र.8,11,13,25,27,28,31,34,49,74 उत्पादक पुरवठादार हे पुणे जिल्हयातील असताना पुरवठा आदेश दिलेल्या उत्पादक पुरवठादार यांचे पुरवठा बाबत मागणी अर्ज दप्तरी नसताना फक्त चार पुरवठादार अ.क्रं.27 जैन इंरिगेशन ,जळगाव व अ.क्रं.28 मे.जयेश इंडस्ट्रिज, पुणे यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहेत मात्र सदर उत्पादक/पुरवठादार यांचे मागणी अर्ज व पुरवठा करण्याबाबत विचारणा केलेले पत्र दप्तरी नाही.

3) ग्रामपंचायतीना यापूर्वी कोणकोणत्या योजने अंतर्गत व कोणकोणत्या निधीमधून सौरपथ दिवे सयंत्र देण्यात आली या बाबतचे अभिलेखे दप्तरी नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग ,ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्रमांक योजना-2013/प्र.क्रं.74/ऊर्जा-7,दिनांक 05/07/2013 मधील सयंत्र अस्थापनेसाठी योजनांच्या/ अंमलबजावणीची कार्यपध्दती मध्ये संयत्रे अस्थापित झाल्यानंतर दैनदिन देखभाल व्यवस्थापनाविषयी उत्पादक पुरवठादारामार्फत प्रशिक्षण देण्यात यावे असे असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ प्रक्रं.456/वित्त -6,दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक नुसार कार्यवाही केली नाही. सदरील योजना शासन परिपत्रकाप्रमाणे राबविली जात नाही .यामुळे लाभार्थी निवड, पुरवठा आदेश व वाटप या बाबत नियोजन नसल्यामुळे दुबार,सदोष लाभार्थी निवड होते व प्रत्यक्ष गरजु लाभार्थी यांची निवड होत नाही व विहीत कालावधीत लाभ मिळत नाही त्यामुळे त्या त्या आर्थिक वर्षात लाभार्थींना लाभ देण्याचा शासनाचा हेतू साध्य होत नाही.

6) सदर नस्तीनुसार 528 नगांचे वाटप आहे त्यांचे डिलिवरी चलन नस्तीसोबत नाहीत त्यामुळे नगांचे वाटप विहित वेळेत झाले का याची तपासणी करता आली नाही.

7) कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र दिनांक 27/11/2012 नुसार सौरदीप चालू केले नंतर त्याची योग्य ती काळजी ग्राम पातळीवर घेतली जात असले बाबतच अहवाल नसती सोबत नाही त्यामुळे सौरदीप चालू आहेत का याची खात्री करता आली नाही.

**3.623 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर बॅटरी स्प्रे पंप वाटण करणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी बॅटरी स्प्रेपंप खरेदीसाठी रक्कम रुपये 29,94,495/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अनुसार योजना राबविण्यासाठी विहीत वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/ सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल करण्याच्या सुचना असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1094/सीआर-2239/34/67 दिनांक 1/9/1993 नुसार लाभार्थ्यांची आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याबाबत अहवाल उपलब्ध झाला नाही.

4) ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

5) तालुकानिहाय पुरविलेल्या 501 नगांचे डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे कोणत्या दिनांकास पुरवठा केला याचा बोध होत नाही.

6) तांत्रिक मान्यतेमध्ये लाभार्थी निवडीबद्दल निकष नमूद नसल्याने निवड काय आधारे केली याची खात्री होणे आवश्यक आहे.

7) चाचणी अहवालातील शेरा कॉलममध्ये क्रमांक नमूद आहेत. परंतू डिलीव्हरी चलनावर सदर नंबर, नमूद नाहीत. तसेच चाचणी अहवालावर दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे चाचणी अहवाल प्राप्त केलेलेच साहित्य मिळाल्याची खात्री करता आली नाही.

**3.624 50 टक्के अनुदानावर 5 एच.पी. ओपनवेल विद्युत पंप संच वाटप करणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी 5 एच.पी. विद्युतपंप संच खरेदीसाठी रक्कम रुपये 5000000/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची तरतूद 50 लक्ष व लाभार्थी हिस्सा रुपये 50 लक्ष असे मिळून योजना रुपये 1 कोटी इतक्या खर्चाची आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 अनुसार 30 लाखापेक्षा जादा खर्चाच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषद सभेस असतांना फक्त स्थायी समितीची मान्यता घेतली आहे.

2) तांत्रिक मंजूरीमध्ये लाभार्थी निवडीचे निकष, लाभार्थी संख्या, घटकांचा तपशिल, अनुदान, लाभार्थी हिस्सा इत्यादी बाबी नमूद करणे अपेक्षित असतांना त्या बाबी नमूद नसल्याने तांत्रिक मंजूरी अपुर्ण आहे.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशु, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास, विभाग शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11ए,दिनांक 27/09/2013 अनुसार औजारांचा पुरवठा 45 दिवसांत न केल्यास औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के रक्कम दंडात्मक वसुली करणे आवश्यक असतांना औजारे उशीरा पुरवठा करुनही 3 टक्के रक्कम रुपये 3,00,000/- दंड वसुली न करता शासन नियमांचे उल्लंघन करुन मुदतवाढ दिली आहे. दंडाची रक्कम वसुली करणे आवश्यक आहे.

4) अनुदान व लाभार्थी हिस्सा मिळून रक्कम रुपये 1 कोटी पुरवठादारांस प्राप्त झाल्याची पोहोच पावती उपलब्ध करणे आवश्यक आहे.

5) पंचायत समिती कराड यांना 88 नग पुरवठा केला आहे. तथापि 87 नगाचा लाभार्थी हिस्सा भरणा केला आहे. एका नगाचा लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 10,000/- वसुली व भरणा करणे आवश्यक आहे.

**3.625 लाभार्थी हिस्स्याची रक्कम जमा न झालेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सांगली कडील लाभार्थी हिस्स्याची रक्कम खर्चाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी विभाग, जिल्हा परिषद सांगली चे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करताना लाभार्थी हिस्सा येणे नोंद वहीची तपासणी केली असता, 50 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप, स्वीय निधीतून 50 टक्के अनुदानावर चापकटर पुरवठा, 50 टक्के अनुदानावर बॅटरीवर चालणारे स्प्रेपंप पुरवठा करणे या योजनांमधील लाभार्थी हिस्स्याची रक्कम लाभार्थ्यांना वस्तूंचा पुरवठा होणे अगोदर वसूल होणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब सदरची रक्कम रुपये 1,40,040/- संबंधित लाभार्थ्यांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

**3.626 विशेष घटक योजना अंतर्गत उणिवाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद कोल्हापूर कृषी विभागामार्फत विशेष घटक योजना राबविली असून त्याकरीता 5 कोटी 50 लाख ची अंदाजपत्रकीय तरतूद केली होती. प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 4,73,11,823/- करण्यात आला असून या अंतर्गत डिझेल इंजिन पंपसेट, पी.व्ही.सी. पाईप, ताडपत्री, सुधारीत औजारे खरेदी करुन ती अनुसूचीत जातीच्या 875 नवबौध्द लाभार्थींना वाटप केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग याचे शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/ वित्त 9,दिनांक 20/06/2008 उपपरिच्छेद 3 व त्यासोबतचे परिशिष्ट इत्यादी तथा कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना अ.क्र. 14 प्रमाणे योजनेचे वेळापत्रक व कार्यपध्दती निश्चित केली आहे त्याप्रमाणे 31 मे पर्यंत लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करणेची असताना दोन्ही वेळापत्रकाचे पालन केले नाही.

2) या योजनेकरीता इलेक्ट्रीक मोटार, डिझेल इंजिन, सुधारीत औजारे व पी.व्ही.सी. पाईप खरेदी ही महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांचेकडून केली असून त्यांना दिलेले पुरवठा आदेश पाहता ते जानेवारी व मार्च मध्ये दिले आहेत. ग्रामविकास व जलसंधारणा परिपत्रक 20 जून 2008 प्रमाणे पुरवठा आदेश हे 30 सप्टेंबर पूर्वी व वाटप 30 नोव्हेंबर पर्यंत होणे आवश्यक असताना ही कार्यपध्दती मार्च अखेर केली आहे.

3) पंचायत समिती स्तरावरील साहित्य प्राप्तीच्या पोहोच पाहता त्यावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे डिलिव्हरी वेळेत झाली नसल्याचे स्पष्ट होते.

4) साहित्य जागेवर पाहोच करणे दरकराराद्वारे निश्चित केला असताना आजरा तालुक्यात पुरवठा केलेले डिझेल इंजिन उतरविण्याचा खर्च रक्कम रुपये 2,100/- पंचायत समितीस करावा लागत आहे तो पुरवठादाराकडून वसुलपात्र ठरतो

5) कागल पंचायत समितीस 14400 मीटर, 90 एम.एम पीव्हीसी पाईपांचा पुरवठा कमी केला आहे. त्याचप्रमाणे करांवर पंचायत समितीस 400 मीटर, 110 एम.एम पीव्हीसी पाईपचा पुरवठा कमी केला आहे. मात्र या पोटी महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळास रक्कम आदा झाली असल्याने अनुक्रमे (13,41,216+37,496) 13,78,712/- रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

6) कृषी आयुक्तालय यांचे अंतिम मार्गदर्शन सूचना दिनांक 31 मे 2014 प्रमाणे सदर योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करणेचे असताना योजनेचा खर्च लाभार्थी याद्या ह्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेच्या असताना त्याची फलश्रुती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

7) एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना लाभ दिल्याने दुबार लाभाची रक्कम रुपये 7,50,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

**3.627 50 टक्के अनुदानावर सुधारीत कृषी औजारे पुरविणे.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद कोल्हापूर कृषी विभागामार्फत जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के अनुदानावर शेती औजारे पुरविणे अंतर्गत सायकल कोळपे, दातेरी विळे, ऊस बेणे कापणी, ऊस बोडके तासणी कोयते यांची खरेदी एमआयडीसी (MIDC) यांचेशी झालेल्या दर करारानुसार केली असून यावर एकूण रक्कम रुपये 17,34,828/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक 04/10/2013 च्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 2 नुसार क्रिडा हैद्राबाद व सीआयई भोपाळ या केंद्रीय संस्था तसेच पंजाबवराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचेशी केलेल्या सामंजस्य करारानुसार औजाराच्या गुणवत्तेबाबत खात्री केलेली नाही.

2) सन 2014-2015 च्या शासन दर कराराऐवजी कालबाह्या सन 2013-2014 च्या शासन कराराआधारे खरेदी केल्यामुळे खरेदी प्रक्रिया नियमबाह्य झाली आहे.

3) औजाराचा पुरवठा हा 55 दिवस उशीरा केल्यामुळे दंडात्मक कार्यवाहीबाबत कृषी आयुक्तालय पुणे यांच्या दिनांक 04/10/2013 चे मार्गदर्शक सूचनानुसार 3 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 7,047/- दंड वसुल होणे आवश्यक आहे.

4) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक 04/10/2013 चे मार्गदर्शक सुचनेमधील अट क्रमांक 1 प्रमाणे कृषी औजारांच्या गुणवत्तेचे हमीपत्र उपलब्ध झाले नाही.

5) सर्व तालुक्यातील 50 टक्के प्रमाणे लाभार्थ्याचा हिस्सा रक्कम रुपये 17,34,828/- ची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

6) पंचायत समिती स्तरावरील विनियोग दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

7) पंचायत समिती चंदगड यांना ऊस बुडके, तासणी विळे व ऊस कापणी विळे हे साहित्य दिनांक 22/05/2015 रोजी मिळाले असल्याचे दाखल्यावरुन दिसून आले सबब दंडात्मक रक्कम 3 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 265/- वसुल होणे आवश्यक आहे.

8) पंचायत समिती कागल यांना ऊस डोळा कापणी, ऊस बोडका तासणी नग 150 हे साहित्य उशिरा म्हणजेच दिनांक 04/06/2015 रोजी मिळाल्याने 3 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 3,969/- वसुल होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र कृषी, उद्योग विकास महामंडळ यांचे पुरवठा चलनावर मागणी संदर्भ क्रमांक 1677/ 07/07/2014 नमुद असून त्यावर दिनांक नमूद नाही त्यामुळे औजारे विहित कालावधीत प्राप्त झाली याची खात्री होत नाही.

### 3.628 जिल्हा परिषद स्वनिधी 50 टक्के अनुदानावर प्लॅस्टीक, कॅनव्हास प्लॅस्टीक एचडीपीई ताडपत्री पुरविणे.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद कोल्हापूर कृषी विभागामार्फत जिल्हा परिषद सेसमधून 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांसाठी ताडपत्री खरेदी ही दर कराराचे आधारे करण्यात आली याकामी रक्कम रुपये 50 लाखची तरतूद करण्यास आली होती. प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 49,98,703/- इतका करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र 446/वित्त 9 मुंबई, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी लाभार्थी निवड 31 मे अखेर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

2) पंचायत समिती स्तरावरुन प्रस्ताव घेऊन, पात्र लाभार्थी निश्चित करुन, खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक असताना लाभार्थी निवड न करता नियमबाह्य खरेदी केली आहे.

3) ताडपत्र्या अत्यल्प भूधारक, मागासवर्गीय शेतकऱ्यांना वाटप केल्या याची खात्री करणेकामी योग्य कागदपत्रे सादर केली नाहीत.

4) डेझ्री इंडस्टीज मुंबई याचा दर करार दिनांक 30/06/2014 रोजी संपुष्टात आलेल्या दिवशी पुरवठा आदेश दिलेला आहे. टॅक्स इन्व्हाइस हा दिनांक 13/07/2014 रोजीचा असल्याने खरेदी प्रक्रिया दरकरार संपुष्टात आल्यानंतर साहित्य खरेदी व पुरवठा नियमबाह्यपणे केला आहे.

5) सर्व ताडपत्री खरेदी नग लाभार्थ्यास वाटप झाल्याबाबत पंचायत समिती स्तरावरुन अहवाल घेणे आवश्यक होते तशी कार्यवाही केलेली नाही.

6) ताडपत्र्या पुरवठा झालेनंतर व त्याचे वाटप पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी हिस्सा भरणा पुरवठा संस्थेस करणेचा आहे. त्याप्रमाणे सर्व गटाचे डी.डी व त्याचा भरणा माहिती उपलब्ध झाली नाही.

### 3.629 50 टक्के अनुदानातून ताडपत्री वाटप योजनेतील उणिवाबाबत

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** 50 टकके अनुदानातून ताडपत्री वाटप योजनेसाठी रक्कम रुपये 15,33,390/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांकजिपसो/जिपसेस/ताडपत्री/कृषि-5/411/2014,दिनांक 30/06/2014 मधील अट क्रमांक 11 अन्वये 4 आठवड्यानंतर पुरवठा केल्यास वस्तूच्या किमतीच्या 3 टक्के रक्कम एकरकमी दंड वसूली करणेत यावा असे नमुद करण्यात आले आहे. तरी वरीलप्रमाणे एकूण रकक्म रुपये 53,409/- इतका दंड वसूल करणेत आलेला नाही.

2) ठराव क्रमांक 237 विषय 13, 5*7 मीटर ताडपत्री वाटपामध्ये खालीलप्रमाणे मोहोळ, करमाळा, माढा, बार्शी या तालुक्यांना मागणी दिनांकाच्या अधि पुरवठा कसा झाला याबाबत खुलासा करावा. तसेच माळशिरस व पंढरपूर तालुक्यांचे मागणी नसतांना पुरवठा केल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र शासन, कृषि व पनन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/प्र.क्र.158/ 11ए,दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र-2 मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 अन्वये प्राप्त साहित्याच्या गुणवत्तेची तपासणी कृषि विद्यापीठे/शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये करून घेणे आवश्यक असताना, तशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषि व पनन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृओ-2013/ प्र.क्र.158/ 11ए,दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र-2 मार्गदर्शक सूचना क्र.19 नुसार औजारांचे दर त्याच औजाराच्या खुल्या बाजारातील दरापेक्षा तुलनेने कमी आहे किंवा कसे हे जाणून घेतलेची कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेच्या स्व-उत्पन्नातून राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभच्या योजनेच्या वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबाजवणी केलेली नाही.

6) ग्राम विकास विभाग क्रमांक परास/सीआर/1633/57,दिनांक 19/01/1995 नुसार साहित्य खरेदीचा पुरवठा आदेश देणेपूर्वी लाभर्थ्याकडून लोकहिस्स्याची रक्कम वसूल करणे बंधनकारक असताना लाभार्थी हिस्सा वसूल न करताच पुरवठा आदेश देणेत आला आहे.

7) मुख्यालयात काही साहित्य ठेवण्यात आले आहेत. तरी याबाबतचे प्रयोजन काय याचा खुलासा करावा.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/ प्र.क्र.481/वित्त-3 मंत्रालय मुंबई-32,दिनांक 12/10/2007 नुसार एकूण निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या 3 टक्के लाभार्थी अपंग असणे आवश्यक आहे. सदर योजनेमध्ये तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/ सीआर/2239/34/67,दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणा झाल्याबाबत अहवाल घेतलेला नाही.

10) सदर योजनेस पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रसिद्दी देण्यात आली नसल्याने योग्य व गरजू योग्य व गरजू लाभर्थ्यांना योजनेचा लाभ मिळाल्याबाबत पडताळणी करता आली नाही. कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्रमांक विप्र/7/विघयो/अंतरिम मासू/2012-12/380/2012, दिनांक 02/05/2012 अन्वये योजनेची माहिती सर्वांना व्हावी या दृष्टिने नमुद केलेनुसार लाभार्थ्यांना देण्यात आलेली लाभाच्या यादीस ग्रामसभेत प्रसिध्दी देण्यात आली नाही.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/ सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटूंबनिहाय / लाभार्थी निहाय व प्रवंर्गनिहाय तालुकास्तरांवर व जिल्हास्तरांवर नोंदवही ठेवून लाभार्थ्याला लाभ दिल्यानंतर जो लाभ दिला त्या लाभाची त्या नोंदवहीमध्ये नोंदी घेणेत आलेल्या नाहीत. एकाच कुटूंबात दूबार लाभ दिला जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारची नोंदवही जिल्हास्तरांवर ठेवण्यात आलेली नाही.

12) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने विभागीय कृषि सहसंचालक यांनी 0.75 टक्के व कृषि विकास अधिकारी यांनी 5 टक्के व जिल्हा कृषि विकास अधिकारी यांनी 10 टक्के तसेच कृषि अधिकारी विघयो पंस स्तर यांनी 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. सदर तपासणीचा अहवाल दप्तरी नाही.

**3.630 सौरदिप खरेदी व पावरपॅक खरेदीवरील आयकर कपातीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** सौरदिप खरेदी व पावरपॅक खरेदीसाठी रक्कम रुपये 1,59,93,044/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

1) शासन दर करार विविध कंपन्यासोबत केलेले आहे. त्यामुळे आयकर अधिनियम 194 (सी) नुसार कंपनीकडून खरेदी केली असल्यास 2 टक्के व पुरवठा हे एक व्यक्ती (वैयक्तीक) असल्यास त्याप्रकरणी 1 टक्के आयकर कपात करणे आवश्यक आहे. शासनाने विविध कंपन्यासोबत दरकरार केलेला असल्यामुळे 2 टक्के आयकर कपात करणे अनिवार्य आहे. वरील सर्व खरेदी प्रकरणात विभागाकडून 1 टक्का आयकर कपात केले आहे त्यामुळे 1 टक्के आयकर कमी कपात झाले आहे. तरी आता वरील खरेदी रक्कम रुपये 1,59,93,044/- चे रुपये 1,59,930/- आयकर वसुल करुन शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

**3.631 जिल्हा परिषद सेस फंडातून 50% अनुदानावर ऑईल/पेट्रो केरोसीन/डिझेल इंजीन पुरविणे (सेस फंड)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत कृषी विभागाने पेट्रोकेरोसीन पंपसेट खरेदी करण्यासाठी रुपये 25 लक्ष ची तरतुद होती त्यापैकी रुपये 24,98,500/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण शासन परिपत्रक क्रमांक दिनांक 20 जुन 2008 अन्वये योजना राबविनेबाबत कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक - परास 1084/सीआ/1633/57, दिनांक 19 जानेवारी 1986 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना तसे न करता साहित्य प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी हिस्सा भरणा केल्याचे आढळून आले आहे.

3) योजनेची मास्टर नोंदवही तपासणी करीता उपलब्ध झाली नाही.

4) पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देण्यात आले नाही.

5) सदर साहित्य व पुरवठा कोणत्या वाहनाने करण्यात आला त्याचा क्रमांक व प्रकार साठा पुस्तकावर नमुद करण्यात आले नाही.

6) सदर साहित्याचा पुरवठा 45 दिवसानंतर करण्यात आलेला असल्याने दंडाची आकारणी करुन वसुल करण्यात यावे.

**3.632 90 टक्के अनुदानावर शेतक-यांना सौर कंदिल पुरविणे (मुळ योजना).**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** कृषी विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी जिल्हा परिषद उपकरामधून सन 2014-15 अंतर्गत सर्वसाधारण शेतक-यांना 90 टक्के अनुदानावर 10 टक्के लाभार्थी हिस्सा घेऊन सौर कंदिल पुरविणे योजने अंतर्गत रुपये 29,43,540/- खर्च नोंदविणेत आलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्रं.448/ वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना शासनाने वेळापत्रक ठरवून दिले आहे.शासन परिपत्रकाप्रमाणे विहीत कालावधीत योजना राबविण्यात आली नाही.

2) पुरवठा आदेश देण्यापूर्वी पुरवठादारा सोबत सुरक्षा अनामत प्राप्त करून तसेच पुरवठादारासोबत सौर कंदीलाची देखभाल व दुरूस्ती साठी 5 वर्षाचा करारनामा करणे आवश्यक असतांना तो 5 वर्षाचा करण्यात आला नाही. करारनाम्यावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे करारनामा वैधता स्पष्ट होत नाही.

3) पंचायत समिती साठा नोंदवही मध्ये 124 नग सौर कंदील लेखापरिक्षण कालावधी पर्यंत शिल्लक असुन वाटप करण्यात आले नाहीत.

4) लाभार्थ्यांचे गाव निहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नसल्यामुळे संबधीतास दुबार लाभ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 3.633 कापूस पेरणी यंत्र पुरविणेबाबत. (विशेष घटक योजना)

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** कृषी विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी सन 2014-15 मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौदध शेतक-यांचे कृषि उत्पादन वाढीस सहाय करून त्यांच्या आर्थिक उन्नतीस मदत होण्याकरीता कापूस पेरणी यंत्र योजनेवर रक्कम रूपये 46,41,000/- खर्च नोंदविण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परीपत्रक क्रमांक जिल्हा परीषद/2008प्र.क्र.446/ वि.स-9/दिनांक 20/06/2008 मधील नमुद तरतुदी नुसार योजनेच्या लाभार्थी निवडीपासुन ते लाभ देणेपर्यंतचे वेळापत्रकानुसार कालमर्यादा पाळण्यात आल्या नाहीत

2) लाभार्थी संख्या 1407 असतांना 1190 प्रस्तावित लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. 217 लाभार्थ्यांना लाभ न देणेबाबत खुलासा करावा.

3) कृषि आयुक्तालयाच्या पत्रानुसार मुद्दा क्रमांक 10 प्रमाणे या योजनेअंतर्गत निवड झालेला शेतकरी अर्थसहाय्याचा दुरुपयोग करणार नाही यासाठी योजना राबविण्याचा अधिकाऱ्यांनी वेळोवेळी भेटी देऊन तपासणी केल्याबाबतच्या नोंदी दैनंदीनीत घेतल्याबाबत अहवाल उपलब्ध केले नाहीत.

4) उपरोक्त पत्रातील मुद्दा क्रमांक 11 प्रमाणे लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थीनिहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

### 3.634 जिल्हा परिषद सेसफंड 2014-15 नाविण्यपुर्ण योजना अपारंपारीक उर्जा कार्यक्रम अंतर्गत 75 टक्के अनुदानावर एलईडी सौर कंदिल पुरविणे खर्चातील अनियमितता.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1)** - नाविण्यपुर्ण योजना अपारंपारीक उर्जा कार्यकमाअंतर्गत 75 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटपाकरीता 75 टक्के शासन अनुदान रुपये 1,297/- व 25 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 433/- प्रमाणे एकुण 1734 लाभार्थ्यावर उपरोक्त तपशिलाप्रमाणे खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.466/वित्त-9 दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट ई मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजना राबविणे संबंधी ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच पंचायत समिती निहाय लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना तशी यादी उपलब्ध झाली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2007/प्र.क्र.4871/ वित्त-3 मंत्रालय मुंबई-400032 दिनांक 05/10/2012 नुसार एकुण पात्र लाभार्थ्या पैकी 3 टक्के लाभार्थी अपंग असणे आवश्यक असतांनी त्याप्रमाणे कार्यवाही आढळून आली नाही. तसेच पुरवठा आदेश अट क्रमांक 9 नुसार करारनामा करण्यात आला नाही. व साहीत्य किंमती एवढी बॅक गॅरंटी घेण्यात आल्याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

3) पुरवठा आदेशातील अटी/शर्ती नुसार सौर कंदिलाचा पुरवठा दिनांक 31/03/2015 पुर्वी करणे आवश्यक असतांनी पंचायत समिती चे डिलेव्हरी मेमोवर वाशिम व कारंजा वगळता इतर पंचायत समितीचे मेमोवर दिनांक नमुद नाही. त्यामुळे विहीत कालावधीत साहीत्य प्राप्त झाल्याची शहनिशा होवु शकत नाही. तसेच गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल घेण्यात आल्याबाबत नस्तीला आढळलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1089/प्र.क्र.55/ दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. तसेच ज्या वित्तीय वर्षात साहीत्याची

खरेदी करण्यात आले त्याच वर्षामध्ये वाटप करणे आवश्यक आहे. तथापी वाटप पुढील वित्तीय वर्षात करण्यात आले आहे.

5) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता अर्ज आवक करण्यात आले नाही.

6) साठा पुस्तकानुसार सौर कंदिल 98 नग शिल्लक असल्यामुळे रुपये 1,69,540/- एवढी रक्कम गुंतुन पडली आहे. पुरवठादारास रक्कम प्रदान केल्याची पोच उपलब्ध झाली नाही.

### 3.635 जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (सर्वसाधारण) 75 टक्के अनुदानावर एलईडी सौर कंदील वाटप खर्चातील अनियमितता.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्राप्त तरतुदी मधून 75 टक्के अनुदानावर एलईडी सौर कंदील वाटपातील 75 टक्के शासन अनुदान रुपये 1,297/- व 25 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 433/- प्रमाणे एकूण 1445 लाभार्थ्यांवर उपरोक्त तपशिला प्रमाणे रुपये 18,75,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.466/वित्त-9 दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट ई मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजना राबविणे संबंधी ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1084/सीआर/1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार खरेदी पुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांनी साहित्य प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी हिस्सा भरणा करण्यात आला आहे. तसेच लाभार्थी निवड केल्याबाबत लाभार्थी यादी तपासणीस उपलब्ध करुन देण्यात आली नाही. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 10 नुसार रुपये 100/- वर बंधपत्र करारनामा करणे बंधनकारक आहे. परंतु करारनाम्यावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही व दिनांक नमुद नसल्यामुळे करारनामा केव्हा करण्यात आला यांची खात्री होत नाही. व साहित्य किंमती एवढी बॅक गॅरंटी घेण्यात आल्याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

3) पुरवठा आदेशातील अटी/शर्ती अट क्रमांक 4 नुसार सौर कंदिलाचा पुरवठा दिनांक 31/03/2015 पुर्वी करणे आवश्यक असतांना पंचायत समिती चे डिलेव्हरी मेमोवर कारंजा वगळता इतर पंचायत समितीचे मेमोवर दिनांक नमुद नाही. त्यामुळे विहीत कालावधीत साहीत्य प्राप्त झाल्याची खात्री पटत नाही. उशिराने पुरवठा करण्यात आल्याबाबत पुरवठा आदेशामध्ये दंडात्मक कार्यवाही बाब अट नमुद करण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1089/प्र.क्र.55/ दिनांक 05/10/1989 अन्वये योजनेची मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. तसेच ज्या वित्तीय वर्षात साहीत्याची खरेदी करण्यात आले त्याच वर्षामध्ये वाटप करणे आवश्यक असतांना सदर साहित्य पुढील वित्तीय वर्षात वाटप करण्यात आले आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 128 नुसार मालमत्ता संपादन करण्याची परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच गुणवत्तेबाबत चाचणी अहवाल नस्ती सोबत आढळलेला नाही.

6) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता अर्ज आवक करण्यात आले नाही.

7) साठा पुस्तकानुसार एलईडी सौर कंदिल 137 नग शिल्लक असल्यामुळे रुपये 2,37,010/- एवढी रक्कम गुंतवुन पडली आहे. सबब सदर साहीत्य लाभार्थ्यांना वितरीत करुन पुरवठादारास रक्कम प्रदान केल्याची चलाण उपलब्ध झाली नाही.

### 3.636 शेतकऱ्यांना 70 टक्के अनुदानावर स्पायरल सेपरेटर पुरविणेतील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्रक446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ मध्ये नमुद दिलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेकरिता लाभार्थ्यांची निवड 31 मे अखेर करुन लाभार्थ्यास प्रत्यक्ष लाभ 30 नोव्हेंबर अखेर देणे आवश्यक होते. याकरिता सदरहू शासन परिपत्रक अन्व्ये योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे विहीत कालावधीत पुर्ण व्हावी यासाठी वेळापत्रक आखून देण्यात आले आहे. तथापि त्यानुसार अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. समर्थनिय खुलासा करावा.

2) महाराष्ट्र शासन, कृषि व पशु संवर्धन विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2010/प्रक 135/119,दिनांक 30/08/2010 चे प्रपत्र 2 नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचना क्र.18 नुसार पुरवठादाराने केलेल्या साहित्याची किंमत खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा जादा असू नये अशी अट असतांना सुध्दा सदर योजनेमध्ये बाजारभाव मागितल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे बाजारभावातील दरापेक्षा जादा दराने कृषि अवजाराची खरेदी केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) पुरवठा आदेश क्रमांक 474, दिनांक 26/03/2015 मधील अट क्रमांक 9 नुसार बिलावर स्पायरल सेपरेटचा तपशिल व नंबरचा उल्लेख करणे आवश्यक असतांना बिलावर तसा उल्लेख केलेला नाही.

4) शेतकऱ्याचे मागणी अर्जावर आवक क्रमाक व दिनांक नमुद नाही. मंजुरीबाबत गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1086/5534, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तसे न केल्याने एकाच लाभार्थ्यांना अनुक योजनामधून किंवा त्याच योजनेतून दुबार लाभ न दिली गेल्याची खात्री पाटवावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्रक 1239, दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) सामुग्रीची पुरवठा दिनांक 31/03/2015 रोजी प्राप्त झाला असता सामुग्रीचे वाटप विलंबाने दिनांक 03/11/2015 रोजी करण्यात आले.

8) पंचायत समिती झरीजामणी यांना पुरवठा केलेल्या 10 नग स्पायरल सेपरेटर दिनांक 31/03/2015 रोजी प्राप्त झाले असून त्याची नोंद साठा नोंदवही मध्ये पृष्ठ क्रमांक 1 वर घेण्यात आली असून शिल्लक साठा 10 नगची वसूली रुपये 36,000/- व पंचायत समिती झरीजामणी 13 नग व पंचायत समिती यवत 40 नग, पंचायत समिती पांढरकवडा 26, पंचायत समिती दिग्रस 2 बाकी दिसून येते, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1090 सी आर 1633/57,दिनांक 16/01/1985 नुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा वसूल होणे आवश्यक असतांना नियमबाह्यपणे पुरवठा आदेश दिला आहे. मागणीचे नियोजन न करता साहित्याची मागणी करण्यात आली आहे. शिल्लक साठा एकूण 91 नगाचे प्रती नग रुपये 3,600/- प्रमाणे रक्कम रुपये 3,27,600/- वसूल करुन जिल्हा परिषदेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

**3.637 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पीव्हीसी पाईप पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर पी.व्ही.सी.पाईप पुरविणे योजनेअंतर्गत रक्कम रुपये 31,49,779/- ऐवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद सेस फंडातून 75 टक्के अनुदानावर शेतक-यांना पीव्हीसी पाईप पुरविण्यात आलेली योजना वेळापत्रकानुसार राबविलेली नाही.

2) लाभार्थी हिस्सा 25 टक्के रक्कम जमा आल्याखेरीज पुरवठा आदेश देण्यात येवू नये असे असतांना पुरवठा आदेश देवून खरेदी प्रक्रिया राबविण्यात आल्याची दिसते. लाभार्थी अर्जावर आवक जावक क्रमांक नमुद नाही.

3) पंचायत समिती आर्णी, बाभुळगाव, कळंब, झरीजामणी, नेर च्या अर्जावर गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांचे अर्ज पडताळणी व शिफारस बाबत अभिप्राय आढळले नाही.

4) पंचायत समितींनी मास्टर नोंदवही ठेवली नसल्याचे आढळले. त्यामुळे दुबारलाभ बाबत पडताळणी करता आली नाही.

**3.638 पंचायत समिती स्तरावरील कृषी विभागाच्या साठा नोंदवहीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90(1,2) अन्वये साठा नोंदवहया अद्यावत करुन प्रत्येक 6 महिन्याला वरीष्ठ अधिकारी तपासणी करुन प्रमाणीत करतील परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच लेखासंहिता नियम 90,91 अन्वये खरेदी आदेश प्राप्त चलान क्रमांक बॅच क्रमांक खरेदी किंमत प्राप्त दिनांक व साहित्य प्राप्तीबाबत प्राप्तीकर्त्याच्या स्वाक्ष-या घेणे आवश्यक असतांना तशाप्रकारे कार्यवाही केली नाही. लेखासंहिता नियम 98 (3) अन्वये साठा नोंदवह्या पडताळणीचे प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

**3.639 50% अनुदानावर शेतकऱ्यांना पावर स्प्रेअर्स पुरवठा योजनेतील खर्चातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा पुर्व तांत्रीक तपासणी अहवाल नस्तीत उपलब्ध नाही.

2) पुरवठा झाल्यानंतर चांचणी अहवाल व गुणवत्ता चांचणी व तपासणी अहवाल नाही.

3) खुल्या बाजारातील दराची तुलना करण्यात आली नाही.

4) पुरवठा आदेशा नुसार पंचायत समिती स्तरावर साहीत्याचे कमी जास्त प्रमाणात पुरवठा करण्यात आला आहे.

5) लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 24,99,758/- रुपये जमा झाला किंवा नाही याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

6) मास्टर, रजिष्टर पंचायत स्तरावर ठेवण्यात आले नाही.

7) लाभार्थ्याचे मागणी अर्ज व मंजुर अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) पुरवठा दारा कडुन साहीत्याचे गुणवत्ते बाबत हमी पत्र घेतल्याचे दिसुन येत नाही.

9) महाराष्ट्र शसन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीओ 2006 प्र.क्र.446/वित्त 9 दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक पाळण्यात आले नाही.

10) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी/1083/67 दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्या कडुन विनियोजन प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

11) संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय पुणे यांचे अंतरिम मार्गदर्शक सूचना दिनांक 4 मे 2013 व 31 मे 2014 नुसार लाभार्थी निवडीचे निकष पूर्ण केलेले नाहीत. उदा-एकुण मंजुर निधीपैकी 3% निधी अपंगाकरीता राखुन ठेवणे,लाभार्थी निवडतांना महीला लाभार्थ्यांना प्राधान्य देणे.

**3.640 प्लास्टीक क्रेट्स खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** व्यंकटेश ट्रेडर्स, भंडारा यांनी प्लॅस्टीक क्रेट्सचा पुरवठा केल्याने रूपये 69,98,525/- चा रोखपुस्तकाला खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा-2012/प्र.क्र97/पंरा-7, दिनांक 23/09/2013 चे 3(3) नुसार निविदा समिती गठीत न करता निविदा स्विकारल्या आहेत. तसेच, दिनांक 31/03/2015 ला निविदा उघडली व त्या एकाच दिवशी खुल्या बाजारातले दर प्राप्त केले, पुरवठा आदेश देवुन

साहित्य प्राप्तही झाले. तसेच कार्यालयीन वेळेनंतर साहित्य प्राप्त व वाटप कसे झाले याबाबत खुलासा न केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 36 चे उल्लंघन झाले आहे.

2) निविदा स्विकृतीनंतर 5 टक्के अनामत रक्कम रूपये 60,000/- जमेबाबत दस्तऐवज नाही तसेच मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 नुसार रूपये 13,99,650/- च्या खरेदी करीता रूपये 500/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केलेला नाही.

साहित्य देतेवेळी पुरवठाधारकाने तपासणी अहवाल सादर केलेला नाही तसेच पुरवठा उशिरा केला असतांनादेखील दंडाची रक्कम कपात केलेली नाही.

3) साहित्याचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर न करता जिल्हा परिषद स्तरावर करण्यात आला व आदेशानुसार साहित्य वाटप करण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक पंरास-1020/ प्र.क्र./14/38, दिनांक 07/01/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल केलेला नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक पंरास-1020/ प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थी निवड निविदा बोलविण्यापुर्वी करण्यात आली नाही. महाराष्ट्र शासन कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्त्यं व्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4 ऐ,दिनांक 24/09/2014 चे 1 टक्के (ii) नुसार निवड यादी सादर करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/वित्त-3,दिनांक 05/10/2012 नुसार 3 टक्के अपंग लाभार्थी निवडीबाबत दस्तऐवज उपलब्ध नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे ‘परिशिष्ट ई’ नुसार योजना राबविण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

**3.641 सौर घरगुती दिप योजना अंतर्गत सामुदायीक अभ्यासिकेमध्ये सौरदिवे लावण्यातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक सौर-2012/प्र.क्र.11/उर्जा-7,दिनांक 06/11/2013 अन्वये सामुदायीक अभ्यासिकेमध्ये 90 टक्के शासन अनुदान व 10 टक्के ग्रामपंचायत हिस्सा नुसार सौर घरगुती दिप बसविण्याचे महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरण, पुणे या संस्थेमार्फत योजनेचे उदिष्ट ठरविण्यात आले. त्याअन्वये सौर दिवे बसविण्याचा पुरवठा आदेश देण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विहित मुदतीत सयंत्र आस्थापीत न केल्यास प्रती आठवडा ½ टक्के दराने दंड आकारून पुरवठादाराच्या देय रकमेतुन कपात करावयाचे असतांना त्यानुसार कार्यवाही न करता पुरवठादारास संपुर्ण रक्कम प्रदान करण्यात आली.

2) MEDA यांचे आदेशानुसार सन 2012-13 या वर्षाकरीता 165 ग्रामपंचायतीला (सन 2011-12 च्या 43 + सन 2012-13 च्या 122 ) सौर दिवे आस्थापीत करावयाचे असल्याने 165 × प्रती नग रूपये 1535/- = 2,53,275/- लाभार्थी हिस्सा पुरवठादाराला प्रदान करण्यात आला.

सन 2011-12 मधील 43 ग्रामपंचायतींच्या लाभार्थी हिस्स्याची रक्कम रूपये 2,020/- प्रमाणे एकूण रुपये 86,860/- वसुल केल्याबाबत दस्तऐवज नाही. सदर 43 ग्रामपंचायतीची यादी सन 2011-12 ची असल्याने त्यांना त्याच आर्थिक वर्षात लाभ का देण्यात आला नाही, याबाबतचा दस्तऐवज नाही. लाभार्थी हिस्सा रूपये 2,020/- प्रमाणे वसुल केला असल्यास फरकाची रक्कम (2020-1535) 485×43 = रुपये 20,855/- आक्षेपाधीन आहे.

3) तांत्रिक अधिकारी यांचे Inspection & Commissioning Report सादर करणे आवश्यक असतांना केवळ 39 ग्रामपंचायतीचेच अहवाल सादर करण्यात आले आहे.

4) सन 2013-14 मध्ये 188 पैकी 175 ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायत लाभार्थी हिस्स्याची रक्कम प्रति ग्रामपंचायत रूपये 1,600/- डिमांड ड्राफ्टद्वारे जमा केली. उर्वरीत 13 ग्रामपंचायतींची लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसुल झाल्याची खात्री करता आली नाही.

5) MEDA यांचे आदेशातील ‘परिशिष्ट अ’ प्रमाणे ग्रामपंचायतीचा तपासणी अहवाल गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या लेटरहेडवर नसल्याने तसेच दिनांक नसल्याने दिवे कधी आस्थापित केले याची खात्री करता आली नाही.

6) जिल्हा परिषद, कृषी विभाग पत्र क्रमांक जिपना/कृषी/अपाउ/431/14,दिनांक 20/02/2014 नुसार सन 2009-10 ते 2012-13 या आर्थिक वर्षात ज्या ग्रामपंचायती अंतर्गत सौर दिवे बसविण्यात आले, त्यांची पुन्हा निवड करु नये असे कळविले असतांनासुद्धा सन 2013 - 2014 मध्ये 8 ग्रामपंचायतींना दुबार लाभ देण्यात आला आहे.

### 3.642 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ऑइल इंजिन / पेट्रो. केरो. इंजिन / इलेक्ट्रीक मोटर पंपसंच वाटप करणे योजनेतील अनियमितता.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** नागपूर जिल्हयातील एकूण 13 पंचायत समितींना 200 नग 3 एच.पी. व 25 नग 5 एच.पी. सबमर्सिबल पंप संच प्रतीनग रूपये 16,500/- व रूपये 20,000/- तसेच 50 नग डिझेल इंजिन प्रतीनग रूपये 24,000/- चा पुरवठा केल्याबाबत खर्च रोखपुस्तकात नोंदविला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 नुसार उशिरा पुरवठा केल्यामुळे दंडाची रक्कम 3 टक्के प्रमाणे रूपये 36000/- वसुल होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20 जून, 2008 चे परिशिष्ट ई नुसार योजना राबविण्यात आली नाही. तसेच सदर योजना ही सन 2013-14 ची होती व पुरवठा आदेश व पुरवठा सन 2013-14 मध्ये झाला असतांना पुरवठादारास रक्कमेचे प्रदान विलंबाने म्हणजे सन 2014-15 मध्ये केल्याबाबत खुलासा सादर केलेला नाही.

3) लेखापरीक्षणाच्या वेळी लाभार्थ्यांचे अर्ज सादर करण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पं.स.का/1020/प्र.क्र./14/38, दिनांक 07/01/2001 नुसार लाभार्थी हिस्सा वसुल न करता खरेदी करण्यात आली आहे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34, दिनांक 29 जुलै, 1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

### 3.643 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पी.व्ही.सी.पाईप पुरविणे.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2)** - प्रमाणक क्रमांक 169 दिनांक 29/01/2015 अन्वये 50 टक्के अनुदानावर शेतक-यांना पी. व्ही. सी. पाईप पुरवठा करण्याकरिता जिल्हा परिषद सेस फंडातून योजना राबविण्यात आली. उपरोक्त प्रमाणकानुसार एकूण 3502 नग रूपये 571.02/- या दराने पी.व्ही.सी. पाईप शोभा पॉलीमर्स प्रा. लि. यवतमाळ यांचेकडून रूपये 19,99,712/- खरेदीबाबत खर्च नोंदविण्यात आलेला आहे. वरील प्रमाणकानुसार 50% अनुदानाची रक्कम रूपये 9,99,856/- प्रदान करण्यात आली. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. विप्र-7/आउयो/अंतरिम मासु/14-15 दिनांक 6 मे 2014 मधील परिशिष्ठ-दोन मध्ये नमुद केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 1 सप्टेंबर 1993 अन्वये साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1083/सीआर 1074/57, दिनांक 29 जुलै, 1982 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 अन्वये योजना सफल झाल्याचे सक्षम प्राधिका-याचे तपासणी अहवाल नाही.

5) शासन निर्णय क्रमांक विघयो 1514/प्र.क्र.97/4अे, दिनांक 07 जुलै, 2014 मधील परिशिष्ट-दोन मधील अनुक्रमांक 8 अन्वये तपासणी करण्यात आल्याचे अहवाल उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही.

6) जिल्हा परिषद स्तरावरून पुरवठा आदेश निर्गमित करतांना लाभार्थ्यांची संख्या व त्यांना वितरित करण्यात येणा-या परिमाणाबाबत निवडसुची अथवा मंजूरी आदेश उपलब्ध नाही.

**3.644 जिल्हा परिषद सेस अंतर्गत सुधारित कृषी अवजारामध्ये 50 टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रेपंपचा पुरवठा करणेबाबतची अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - प्रमाणक क्रमांक 183 दिनांक 15/09/2014 रुपये 4,98,750/- पुरवठादार द महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेण्ट कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई जिल्हा परिषद सेस फंडाअंतर्गत सुधारीत कृषी अवजारामध्ये बॅटरी ऑपरेटेड नॅपसॅक स्प्रेपंपचा पुरवठा करण्याकरिता खर्च झाल्याचे दिसून येते.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास/1094/ सीआर/1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवडयादी जाहीर करु नये. असे असतांना सर्व आठही पंचायत समितीकडून एकूण रूपये 4,98,750/- लाभार्थी हिस्सा लेखा परिक्षणापर्यंत वसुल करण्यात आला नसल्याचे दस्ताऐवजावरुन दिसून येते.

2) पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जिल्हा परिषद स्तरावर ठेवण्यात आले नाही त्यामुळे पात्र व अपात्रबाबत अभिप्राय देता आला नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 तसेच शासन निर्णय दिनांक 17 जानेवारी 2001 अन्वये जिल्हा परिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

4) डिलिव्हरी मेमो मध्ये तारीख नमूद नसतांना साठा पुस्तकात साहित्य प्राप्तीचा दिनांक 17/02/15 नमूद आहे तेव्हा साहित्य प्राप्त झाल्याचे अभिप्रेत होत नाही.

5) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास 1089/प्र.क्र.565/34 दिनांक 05/10/1989 तथा दि. 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतू ती सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्य/वस्तु प्राप्त केल्यानंतर पंचायत समितीने चांगल्या दर्जाचे व गुणवत्तेनुसार योग्य असल्याचे प्रमाणपत्र नस्तीत नाही. (चाचणी/ तपासणी अहवाल वगळता)

7) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सूचना जावक क्रमांक- विप्र-7/विघयो/अंतरिम मासु/14-15/459/14 दिनांक 31/05/2014 अन्वये मुद्दा क्रमांक 11 नुसार तपासणी अहवाल ठेवला नाही.

8) सदर साहित्य शेतक-यास प्राप्त झाल्याचे व ते त्याचा उपयोग करीत असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र/ मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1082/645/34 दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन केल्याचे दिसून येत नाही.

**3.645 विशेष घटक योजनेअंतर्गत शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर डिझेल इंजिनचा पुरवठा करण्यातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद वर्धाचे कृषी विभागामार्फत सन 2014-15 मध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीचे शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय देण्याच्या योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर महाराष्ट्र कृषी उदयोग विकास महामंडळामार्फत ग्रिव्हज कॉटन कंपनीचे एकूण 59 नग डिझेल ऑईल इंजिनचा पुरवठा करण्यासाठी प्रतिनग रुपये 19,000/- प्रमाणे प्रमाणक क्रमांक 93 दिनांक 30/3/2015 नुसार प्रथम पुरवठा आदेशातील 37 नगासाठी एकूण रुपये 7,03,000/- इतका खर्च करण्यात आला. व्दितीय पुरवठा आदेशातील 22 नगाची रक्कम अदा करणे बाकी आहे. त्याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) कृषी आयुक्तालयाचे मार्गदर्शक सूचना दिनांक 2/05/2014 तील लाभार्थी निवडीचे निकष, प्राधान्यक्रम तसेच लाभार्थी निवड समितीचे निकषानुसार लाभार्थींची निवड करण्यात आल्याचा तपशिल लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

2) डिझेल इंजिनची मागणी यादी प्रमाणित करण्यात आली नसून त्यावर लाभार्थींच्या स्वाक्ष-या नोंदविण्यात आलेल्या नाहीत. तसेच साहित्याचे पुरवठा यादीदेखील लाभार्थींच्या दिनांकीत स्वाक्ष्-यासह प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत.

3) श्रीमती कांताबाई थुल, तुषार ढोबळे, मधुकर मुंजेवार, मधुकर गायकवाड, ईश्वर थुल, शालीक सुटे, भाउराव थुल, वासुदेव फुटाणे, किशोर मुंजेवार, संतोष पुनवटकर पंचायत समिती हिंगणघाट अंतर्गत यांची नांवे दिनांक 31/12/2014 चे व्दितीय यादीनुसार मंजूर झाले असतांना त्यांना साहित्याचे वाटप दिनांक 7/08/2014 चे पहिल्या मंजूर यादीनुसार नांव नसतानादेखील साहित्य वाटप केल्याचे दर्शविले आहे. जिल्हा परिषद चा पुरवठा आदेश क्रमांक 1840 दिनांक 20/10/2014. पंचायत समिती हिंगणघाटचे साठापुस्तकात साहित्य प्राप्तीबाबतचा दिनांक तसेच आदेश, किंमत इत्यादी तपशिल नमूद नाही.

4) योजनेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तसेच मूल्यमापन अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही. तसेच लाभार्थी साहित्याचा वापर करीत असल्याबाबतचे आणि त्याच्या देखभाल दुरुस्तीबाबत कोणताही तपशिल ठेवण्यात आलेला नाही.

5) ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दिनांक 05/10/1989 व दिनांक 2/9/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक होते मात्र तसे न केल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ मिळाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) मार्गदर्शक सूचना क्रमांक 10 नुसार योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकारी यांनी तपासणी केल्याबाबतचा अभिलेख ठेवण्यात आलेला नाही.

7) मार्गदर्शक सूचना क्रमांक 5 नुसार योजनेच्या प्रसिध्दीबाबत कार्यवाही करणेबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

8) योजेनेतील तरतूदीनुसार रुपये 50,000/- चे मर्यादेत लाभ देण्याचे अनुषंगाने लाभार्थ्यांना अन्य कोणत्या घटकांचा लाभ देण्यात आला याबाबतची माहिती त्यांचे स्वाक्षरीसह ठेवण्यात आलेली नाही.

9) मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 मधील लेखा पध्दतीत नमूद केल्याप्रमाणे नोंदवह्या लेखापरीक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत.

10) लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत झाली असल्याचा ठरावाची प्रत तसेच प्रत्यक्षात लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी ग्रामपंचायतीस पाठविली असल्याचे नस्तीत दिसून आली नाही.

11) आयुक्तालयाचे पत्र क्रमांक 460 दिनांक 6/05/2014 मधील मार्गदर्शक सूचना क्रमांक 9 नुसार इंजिनाव्दारे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता असल्याची खात्री केल्याबाबतचा अहवाल नस्तीत आढळून आला नाही.

**3.646 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना ताडपत्री वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** कृषी विभागातर्फे 606 नग ताडपत्री ( 370 G.S.M, 48 चौरस मीटर, काळारंग ) प्रती नग रुपये 5,150/- ला एकुण 31,20,900/- ला खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास 1093/ प्र.क्र.178/03, दिनांक 9 आक्टोंबर, 1997 अन्वये आय.एस.आय. प्रमाणित केलेली सर्वात कमी दराचे साहित्य खरेदी करणे बंधनकारक आहे. शासन दर करारानुसार 200 जी.एस.एम.ची ताडपत्री उपलब्ध असतांना 370 जीएसएम दराची ताडपत्री खरेदी केल्यामुळे (5150-2784) = 2366*606 = 14,33,796/- रुपये जादा खर्च झाला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रंमाक झेडपीए 2008/ प्र.क्र.466/वित्त-09, दिनांक 20 जुन, 2008 अन्वये योजनांची विहित वेळापत्रकानुसार अंमलबजावणी केली नाही.

**3.647 ग्रामीण भागातील आपातग्रस्तांना घरावरील छतांकरीता 100 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** भंडारा जिल्हयात झालेल्या वादळी पाउस व गारपीटीमुळे घरावरील छताकरीता तातडीने ताडपत्री पुरविण्याकरीता मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद भंडारा व मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये 5355 नग ताडपत्री प्रती नग रुपये 1,980/- ला एकुण रुपये 1,06,02,900/- ला खरेदी करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रंमाक पंरास 1093/ प्र.क्र.178/03, दिनांक 9 आक्टोंबर, 1997 अन्वये आय.एस.आय प्रमाणित केलेली सर्वात कमी दराचे साहित्य खरेदी करणे बंधनकारक आहे. शासन दर करारानुसार 200 जी.एस.एम ची ताडपत्री उपलब्ध असतांना 250 जीएसएम ची ताडपत्री खरेदी केल्यामुळे (1980-1900.8) = 79.20X5355 = 4,24,116/- रुपये जादा खर्च झाला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रंमाक 1093/प्र.क्र.1930, दिनांक 01/09/1993 नुसार एकाच लाभार्थीस दुबार लाभ दिला जाणार नाही याबाबत मास्टर नोंदवही ठेवली नाही.

3) लाभार्थीचे अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

**3.648 शंभर टक्के अनुदानावर आदिवासी क्षेत्राबाहेरील शेतक-यांना लोखंडी बैल गाडीचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2)** - प्रमाणक क्रमांक 592, दिनांक 24/02/2015 रक्कम रुपये 9,45,000/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/ प्र.क्र.158/ 11 अे, दिनांक 27/09/2013 मधील अट क्रमांक 8 नुसार 45 दिवसाचे कालावधीत पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्याने देयकातुन 3 टक्के रक्कम रुपये 28,350/- ची वसुली केलेली नाही.

2) पुरवठा आदेश् क्रमांक 2308, दिनांक 20/12/2014 अन्वये डि.एम. वर पुरवठा केलेल्या आदेशातील वर्णनाप्रमाणे साहित्याचा तपशील नमुद केलेला नाही. त्यामुळे मागणी स्पेसीफीकेशननुसार पुरवठा झाल्याचे खात्री पटवावी.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1083/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. नसल्याने अर्धसमास पत्र् क्रमांक 2 दिनांक 07/07/2016 अन्वये मागणी करूनही मास्टर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन देण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड पी.ए-2008/प्र.क्र. 446 वित्त-9 मुंबई दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

5) लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध् केलेले नाही.

6) योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचा फलनिष्पत्ती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

7) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने विभागीय कृषी संचालक, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी विकास अधिकारी, व कृषी अधिकारी (विघयो) यांनी नमून दिलेल्या टक्केवारी नुसार तपासणी केल्याचा अहवाल लेखापरीक्षणास दिसून आला नाही.

**3.649 100 टक्के अनुदानावर आदिवासी क्षेत्राअंतर्गत शेतक-यांना लोखंडी बैलगाडीचा पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - प्रमाणक क्रमांक 590, दिनांक 24/02/2015 रक्कम रुपये 23,46,750/- बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यावसय विकास व मत्सव्यावसाय विभाग,शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11 अे दिनांक 27/09/2013 मधील अट क्रमांक 8 नुसार 45 दिवसाचे कालावधीत पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्याने देयकातुन 3 टक्के रक्कम रुपये 70,403/- ची वसुली केलेली नाही.

2) पुरवठा आदेश क्रमांक 2323 दिनांक 20/12/2014 अन्वये डिएमवर पुरवठा केलेल्या आदेशातील वर्णनाप्रमाणे साहीत्याचा तपशील नमुद केलेला नाही. त्यामुळे मागणी स्पेसीफीकेशननुसार पुरवठा झाल्याचे खात्री पटवावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास-1083/ प्र.क्र.1239/34, मुंबई दिनांक 01/09/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र् क्रमांक 2 दिनांक 07/07/2016 अन्वये मागणी करूनही मास्टर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध् करून देण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेड पी.ए-2008/प्र.क्र. 446 वित्त-9 मुंबई दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

5) लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध् केलेले नाही.

6) योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचा फलनिष्पत्ती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

7) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने विभागीय कृषी संचालक, कृषी विकास अधिकारी, जिल्हा कृषी विकास अधिकारी व कृषी अधिकारी (विघयो) यांनी नेमुन दिलेल्या टक्केवारी नुसार तपासणी केल्याचा अहवाल लेखापरीक्षणास दिसून आला नाही.

**3.650 सन 2013-2014 चे यादीतील लाभार्थ्यांना बैलजोडी व नवीन सिंचन विहीर बांधकामाचे अनुदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सन 2013-2014 या वर्षात मंजुर लाभार्थ्यांना आदीवासी उपयोजना (क्षेत्राबाहेरील) अंतर्गत पंचायत समितीस्तरावर बैलजोडी व नवीन सिंचन विहीर बांधकामाकरीता रुपये 62,60,000/- अनुदान वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड यादी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

2) प्रपत्र 2 अ व ब नस्ती सोबत जोडण्यात आलेले नाहीत.

3) सन 2013-2014 व 2014-2015 चा मागणी प्रस्ताव कधी प्राप्त झालेत त्याबाबत पत्र उपलब्ध नाही. तसेच त्याबाबतची नोंदवही ठेवण्यात आली नाही.

4) सन 2014-2015 चे लाभार्थ्यांचे अर्ज (प्रस्ताव) पंचायत समिती चिमुरकडुन जिल्हा परीषद चंद्रपूरला पत्र क्रमांक 155, दिनांक 20/07/2014 ला प्राप्त झाले असुन, त्यांची निवड दिनांक 27/03/2015 चे सभेत मंजुर करण्यात आली. म्हणजेच माहे जुन 2014 अखेर लाभार्थी निवड केलेली नाही.

**3.651 आवश्यक नसतांना कोषागारातुन राशी आहरीत केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** कृषि विभागाला सन 2014-2015 या आर्थिक वर्षात योजनेवर एकुण रुपये 13,56,89,393/- इतका निधी प्राप्त झाला आणि तेवढा निधी कोषागारातुन आहरीत केला. केलेल्या तरतुदीचे 100 टक्के विनियोग (खर्च) होणे अभिप्रेत होते. परंतु सन 2014-15 च्या तरतुदीमधुन रुपये 6,33,08,278/- इतका खर्च झाला. म्हणजे प्राप्त तरतुदीच्या 46.65 टक्के खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 मध्ये प्राप्त होणारी तरतुद 100 टक्के खर्च (विनियोग) होणे अभिप्रेत असतांना तरतुदीच्या 46.65 टक्के खर्च केला करण्यात आला.

2) तरतूद खर्च दोन वर्षात खर्च करता येतो ही भावना ठेवुन जर खर्च झाला असेल तर कोषागारातुन तरतुद काढण्याचे प्रयोजन काय? खर्च होणार नाही असे लक्षात आल्यानंतर ती समर्पण करणे जरुरी होते. परंतु तसे न करता मार्च महीन्यात सुध्दा राशी कोषागारातुन आहरीत करण्यात आली.

3) सन 2013-14 मधील अखर्चित तरतुद प्रथम खर्च करणे अपेक्षित होते. परंतु त्यामधील प्रकर्षित तेल बिया विकास कार्यक्रम (2401-7471) मध्ये सन 2013-14 च्या शिल्लक रुपये 16,05,750/- मधुन फक्त रुपये 4,34,637/- इतका खर्च करण्यात आला उर्वरीत निधी खर्च झाला नाही. यावरुन लाभार्थ्यांना त्यांच्या हक्कापासुन वंचित ठेवण्यात आले आहे.

4) सन 2014-15 या आर्थिक वर्षात तरतुदीच्या 46.56 टक्के खर्च केला. सन 2014-15 मध्ये ज्या अर्थी तरतुदीची मागणी केली त्याअर्थी लाभार्थी निवड आणि लाभार्थ्याला लाभ देण्यासाठी पुर्ण नियोजन करण्यात आले असेल तर नियोजन असतांना लाभार्थी निवड असतांनासुध्दा राशी अखर्चित ठेवणे म्हणजे लाभार्थ्यांना लाभापासुन वंचित ठेवणे आहे.

5) सन 2013-14 मधील अखर्चित राशी 31 मार्च 2015 संपल्यानंतर कधी भरणा केली याबाबत चलान दर्शवावे.

6) आस्थापना अनुदान ज्यावर्षी प्राप्त झाले त्याच वर्षात खर्च करावयाचे आहे. अन्यथा अनुदान निर्धारणाची वाट न पाहता 31 मार्च नंतर लगेच अखर्चित राशी भरणे जरुरी आहे. तर कधी भरली असल्यास याबाबत चलान दर्शवावे.

**3.652 शेतक-यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य मधिल अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** शेतक-यांना कृषि विकासासाठी अर्थसहाय्यावर कृषी साहित्य (ऑइल इंजिन,नॅपसॅक स्प्रेअर, पॉवर स्प्रेअर) पुरविण्यासाठी दुसरे व अंतिम प्रमाणक क्रमांक 182,दिनांक 31/03/2015 नुसार एकुण रुपये 22,35,755/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी हिस्सा (लोकवाटा) रक्कम रुपये 1,60,000/- जमा केल्याबाबत तपशील नस्तीला आढळुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक आउयो 2414/प्र.क्र.133/4अ,दिनांक 05 जुन 2014 परीशिष्ट-एक नुसार कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देणेस्तव बाब व बाबनिहाय अनुदानाची टक्केवारी व अनुदान मर्यादा ठरवुन दिलेली आहे. परीशिष्ट 3 (9) नुसार लाभार्थी निवडीचा कालावधी योजनेचा अंमलबजावणीसाठी निवड झालेले वर्ष व त्यापुढील वर्ष दोन वर्षाचा आहे. त्यामुळे सन 2013-2014 मध्ये निवड झालेले लाभार्थी पैकी दिनांक 31/03/2014 अखेर किती लाभार्थ्यांना लाभ दिला दिनांक 01/04/2014 ला किती लाभार्थी शिल्लक आहे. याचा आढावा घेउुन सन 2014-2015 चे लाभार्थी निवड करणे अपेक्षित आहे. तसेच प्रथम सन 2013-2014 मधील लाभार्थीचा लाभ देणे अपेक्षित आहे. परंतु तसे केल्याचे दस्तावेजावरुन आढळुन आले नाही.

3) शेतक-यांना कृषी विकासासाठी अर्थसहाय्य देणे परीशिष्ट तीन नुसार गडचिरोली जिल्हयातील माडीया गोंड जमातीच्या 25 टक्के लाभार्थीची निवड आदीवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थी निवड होणे आवश्यक आहे. परंतु सन 2014-2015 चे लाभार्थी यादीमध्ये जात नमुद नसल्यामुळे माडीया गोंड जमातीच्या 25 टक्के लाभार्थीची निवड झाल्याबद्दल स्पष्ट होत नाही.

4) दहा लाभार्थीना लाभ देतेवेळी समुह विकास (Cluster approach) हा दृष्टीकोन समोर ठेवुन मागास तालुक्यातील अत्यंत मागासलेल्या गावाची निवड करुन लाभ देणे आवश्यक आहे. परंतु तसे केल्याचे आढळुन आले नाही.

5) लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अर्थसहाय्याची योजना निहाय, बाब निहाय, लाभार्थी निहाय, देण्यात आलेल्या लाभाची अनुदानाची नोंदवही कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. व या नोंदवहीची तपासणी जिल्हा कृषी अधिकारी यांनी सांक्षाकीत करणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही ठेवल्याचे आढळुन आले नाही.

6) सदर योजनेला जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. तसेच त्या क्षेत्रातील स्वंयसेवी संस्थाशी संपर्क साधुन त्याच्या मार्फत देखील प्रसिध्दी द्यावी परंतु तसे केल्याचे आढळुन आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक: सुकृओ-2013/प्र.क्र.158/11-अ,दिनांक 27/09/2013 मार्गदर्शक सुचना 8 नुसार औजाराची मागणी नोंदवण्यावर 45 दिवसाचे आत पुरवठा न केलेल्या औजाराच्या किमतीच्या 3 टक्के प्रमाणे पुरवठादार संस्थेकडुन एक रक्कमी दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. पुरवठा आदेश क्रमांक 2304,दिनांक 04/12/2014 व आदेश क्रमांक 1865 दिनांक 31/08/2014 नॅपसॅक स्प्रेअर (इनसॉईट चेवर) आऊटसाईट चेवर, बॅटरी ऑपरेटर, तसेच पॉवर कम डस्टर चा पुरवठा विलंबाने झाल्यामुळे रक्कम रूपये 14,35,775/- चे साहीत्यावर 3 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 43,073/- कपात करणे आवश्यक होते. परंतु प्रमाणक क्रमांक 132 दिनांक 31/03/2015 मधुन रक्कम रूपये 15,117/- कपात केलेली आहे. तरी उर्वरीत रक्कम रुपये 27,956/- संबंधीताकडून वसुल करण्यात यावी.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे कलम 20 व 21 नुसार पुरवठादाराकडुन मुद्रांक पावत्या नाही.

9) कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे याचे मार्गदर्शक सुचना जा.क्रं.विप्र-7/आउयो/ 14-15/460,दिनांक 02/06/2014 अनुक्रमांक 14 नुसार कृषी विकास अधिकारी यांनी 5 टक्के तपासणी करुन तपासणीचा अहवाल शासनास पाठविणे आवश्यक आहे. परंतु अहवाल पाठविल्याचे आढळुन आले नाही.

**3.653 तृणधान्य बियाण्यावर अनुदान देणे योजनेमधिल अनियमितता**.

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** तृणधान्य बियाण्यावर अनुदान देणे या योजनेवर दुसरे व अंतिम प्रमाणक क्रमांक 1248, दिनांक 27/03/2015 नुसार 14,45,360/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना लाभार्थी हिस्सा सहभागसह आहे. योजनेस रक्कम रूपये 14.43+14.43=28.86 लक्ष ला मंजुरी देणे आवश्यक होते. परंतु रक्कम रूपये 14.43 लक्ष रक्कमेला मंजुरी घेतल्याचे दिसुन येते.

2) बियाणे वाटपानुसार लाभार्थी हिस्सा दिनांक 31/03/2015 अखेर पंचायत समिती भामरागडकडे रक्कम रूपये 1,15,300/- व पंचायत समिती सिरोंचाकडे रक्कम रूपये 96,350/- (पत्र क्रमांक 631, दिनांक 21/04/2015 नुसार) एकुण रक्कम रूपये 2,11,650/- प्रलंबित असल्याचे दिसुन येते.

3) सदर योजने अंतर्गत पंचायत समीती स्तरावर लाभार्थी निवड झाल्याबद्दल पंचायत समितीने मंजुरी पत्र / ठराव नस्तीला आढळुन आले नाही.

4) लाभार्थी निवड / लाभार्थी हिस्सा जमा न करता पुरवठा आदेश दिल्याचे दिसुन येते.

5) योजनेचा फलश्रृती अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र, विनियोजन दाखले प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही.

6) योजना वनक्षेत्रात राबविण्यात आल्याबाबत अहवाल प्राप्त केल्याचे दस्तऐवज आढळुन आले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 मधील कलम 20 व 21 नुसार पुरवठादाराची मुद्रांक पावती प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही. पुरवठा केलेल्या बियाणाची उपज क्षमता टक्केवारी प्रमाण काय आहे. याबाबत बियाण्याची गुणवता तपासणी अहवाल प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही.

**3.654 विशेष घटक योजनेतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना बैलगाडी पुरवठा करणे योजनेतील अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** कृषि विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 हया वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विशेष घटक योजनेतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना बैलगाडी पुरवठा करणे योजनेवर रक्कम रुपये 58,25,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र क्र.41/33, दिनांक 17/01/2011 व शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र./446/वित्त -9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट (ई) वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी त्यात दिलेल्या स्थायी सुचनेनुसार, योजनांची निवड, प्रक्रिया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप, विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे इत्यादी कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास 1093/ प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक (7) नुसार जिल्हा परिषदेने स्वत:च्या निधीतून ज्या योजना राबविलेल्या आहेत. त्या योजनेचे साहीत्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झालेले नाही.

3) शासन निर्णय क्रमांक सुकऔ/2013/प्र.क/158/11-अे, दिनांक 27/09/2013 मधील मार्गदर्शन सुचना क्रमांक 03 नुसार औजाराचे केंद्रीय तपासणी संस्थेचे/ कृषी विदयापिठाचे तपासणी अहवालाची प्रत सलग्न करुनच पुरवठा करावयास पाहीजे. परंतु सदर शासन निर्णया प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.655 विशेष घटक योजनेतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना पी.व्ही.सी.पाईप पुरवठा करणे योजनेतील अनियमितताबात.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** कृषि विभाग जिल्हा परिषद औरंगाबादचे सन 2014-2015 हया वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विशेष घटक योजनेतंर्गत 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना पी.व्ही.सी.पाइप पुरवठा करणे योजनेवर रक्कम रुपये 56,55,818/- खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/ प्र.क्र.41/33,दिनांक 17/01/2011 व त्या अनुषंगाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र./446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट (ई) वैयक्तीक लाभच्या योजना राबविण्यासाठी त्यात दिलेल्या स्थायी सुचनेनुसार, योजनांची निवड, प्रक्रिया, पुरवठा आदेश, साहित्याचे वाटप, विनीयोग प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे इत्यादी कार्यवाही ठरवून दिलेल्या वेळापत्रका प्रमाणे अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, निर्णय क्रमांक मागास 1093/प्र. क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक (7) नुसार जिल्हा परिषदेने स्वत:च्या निधीतून ज्या योजना राबविलेल्या आहेत. त्या योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु सदर योजनेचे साहित्य त्याच वर्षात वाटप झालेले नाही.

3) शासन निर्णय क्रमांक सुकऔ /2013/प्र.क/158/11-अे, दिनांक 27/09/2013 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 03 नुसार औजाराचे केंद्रीय तपासणी संस्थेचे/कृषी विदयापिठाचे तपासणी अहवालाची प्रत सलग्न् करुनच पुरवठा करावयास पाहीजे. परंतु सदर शासन निर्णया प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.656 विशेष घटक योजनेतंर्गत अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर तुषार संच, डिझेल इंजिन, विद्युत मोटार पंप, न्युमॅटीक पॉवर स्प्रे पंप, नॅपसॅक स्प्रेपंप, ॲडजेस्टेबल वखर, ॲडजेस्टेबल तिफन, बैलगाडी पेट्रो - केरोसीन इंजिन पंपसेट, ताडपत्री पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक प्र.क्र./1239/34,दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांना वाटप करणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसुन येत नाही.

2) शासन परीपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमाक पंरास/ 1089/646/266/34 दिनांक 29/07/1989 नुसार योजनेतुन पुरविलेल्या औजारांमुळे लाभार्थी प्रगती, कृषि उत्पन्नात वाढ याबाबत फलश्रृती अहवाल घेतला नाही व खर्चाची उपयोगिता स्पष्ट होत नाही.

3) शासन पत्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक बीजीएस/1004/प्र.क्र.160,दिनांक 28/12/2004 नुसार ग्रामविकास विभाग खादी व ग्रामोद्योग, स्वयंसेवी संस्था इत्यादी यंत्रणे मार्फत ही योजना राबविली जाते त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करतांना अशा अन्य यंत्रणेमार्फत लाभधारकास लाभ प्रदान झालेला आहे किंवा कसे याबाबतची खात्री करुन एकाच प्रयोजनार्थ दुबार लाभ प्रदान होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4) शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन व दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग क्रमांक विघयो-1612/प्र.क्रं./119/4ए,दिनांक 22/10/2012 नुसार मधील अ.क्रं.5 (6) नुसार लाभार्थ्यांची यादी जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालय तसेच शासन संकेतस्थळावर (इंटरनेट) वर उपलब्ध करणे आवश्यक असताना शासन संकेतस्थळावर (वेबसाईट / इंटरनेट) वर उपलब्ध केल्याबाबत दिसून आलेले नाही.

5) शासन परिपत्रक क्रमांक पंरास-10952/प्र.क्रं./73/34,दिनांक 20/11/1999 नुसार प्रपत्र अ मध्ये मास्टर रजिस्टर ठेऊन दुबार लाभ टाळण्याच्या दृष्टीने उपाययोजना केलेली दिसून आलेली नाही.

6) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पंरास/1084/सीआर/1633, दिनांक 19/01/1985 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजना राबविताना लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल केल्यानंतरच योजना कार्यान्वित करण्याचे निर्देश असताना सदरील नियमांचे पालन झालेले दिसून येत नाही.

**3.657 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पॉवर ऑपरेटेड न्युमेटिक स्पेअरकम डस्स्टर (पावर स्प्रे) वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 13,98,267/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेतून पुरविलेल्या औजारांमूळे लाभार्थी प्रगती, कृषि उत्पन्नात वाढ याबाबत फलश्रृती अहवाल घेतला नाही व खर्चाची उपयोगिता स्पष्ट होत नाही.

2) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए/20800/प्र.क्रं. 446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार योजना लाभार्थी निवड दि.31.05.2013 अखेर व साहित्य वाटप तसेच माहे मार्च, 2014 पर्यन्त पूर्णपणे विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

3) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक 1093/सीआर-1239/34, दिनांक 09/09/2013 मधील परिच्छेद 4 नुसार वैयक्तीक लाभ दिल्यानंतर त्यांची नोंदवही ठेवणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली दिसुन आलेली नाही.

4) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक प्र.क्रं./1239/34,दिनांक 01/09/1993 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांना वाटप करणे बंधनकारक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

**3.658 शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर बैलगाडी वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 2,02,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 या वित्तिय वर्षात जि प उपकर योजनेतुन शेतक-यांना 50 टक्के अनुदानावर बैलगाडी खरेदीसाठी दिनांक 26.08.2014 अन्वये महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ (एम.आय.डी.सी), औरंगाबाद यांना आदेश देण्यात आला असुन सदर पुरवठादाराकडुन दिनांक 31/03/2015 रोजी पुरवठा झाल्याचे लेखापरिक्षणास आढळुन आले.

शासन निर्णय कृषि व पदम विभाग क्रमांक सु.क्रु.ओ-2013/प्र.क.158/11 अ,दिंनाक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र -2 मार्गदर्शक सुचना अनु क्र.8 नुसार औजाराची मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाच्या कालावधीत औजाराच्या पुरवठा करण्याची जबाबदारी संबंधीत पुरवठादाराची असेल. 45 दिवसानंतर दंडात्मक वसुली 3 टक्के न करता पुरवठादारास रक्कम प्रदान केल्याचे लेखापरिक्षणास दिसुन येते. अवजार साहित्य किंमत 2,02,500/- चे 3 टक्के रुपये 6,075/- वसुलपात्र आहे.

2) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रंमांक झेडपीए/20800/प्र.क्रं. 446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार योजना लाभार्थी निवड दिनांक 31/05/2013 अखेर व साहित्य वाटप तसेच माहे मार्च, 2014 पर्यंत पूर्णपणे विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली दिसून आलेली नाही.

3) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पंरास/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेतून पुरविलेल्या औजारांमूळे लाभार्थी प्रगती, कृषि उत्पन्नात वाढ याबाबत फलश्रृती अहवाल घेतला नाही व खर्चाची उपयोगिता स्पष्ट होत नाही.

**3.659 विशेष घटक योजने अंतर्गत बैलगाडी वाटपातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** कृषि विभाग जिल्हा परिषद बीड सन 2012-2013 या वर्षाच्या विशेष घटक योजनेतर्गत 151 नग बैलगाडया 100% अनुदानावर खरेदी केल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती स्तरावर बैलगाडीचा पुरवठा दिनांक 31/03/2013 रोजी केलेला असताना पुरवठादाराचे देयक उपप्रमाणक क्रमांक 13.269 दिनांक 28/03/2013 रोजी कार्यालयास दिले आहे म्हणजे प्रत्यक्ष पुरवठा होण्याआधीच मागणी केली आहे,बैलगाडीची वाहन क्षमता 1000 किग्रॅ असल्याचे नमुद नाही, शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. संकृऔ-2511/प्रक्र 31/11अे दिनांक 22/11/2011 अनुसार टेस्टींग स्टँडर्ड नुसार बैलगाडी 1512914(P1): 1980 नाही ,बैलगाडी सोबत वॉरंटी पत्र नाही.

2) मागणी माहे मार्च 2013 ची असुन देयक मार्च 2015 मध्ये अदा केले आहे. सदर मागणी कालबाह्य असल्याने यास लेखासंहिता 1968 चे नियम 44 व 45 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्व मंजुरी घेवूनच देयक अदा करणे आवश्यक होते.

3) प्राप्त साहीत्य विलंबाने पुरवठा केल्याने पुरवठादारास 3% दंडात्मक कार्यवाही करणे आवशयक होते. याबाबत रुपये 42,30,000/- चे 3 टक्के रुपये 1,26,900/- रक्कम वसुलपात्र ठरते.

4) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक 1098/प्र.क्र. 73/34 दिनांक 20/10/1999 नुसार योजनेची व्यापक प्रसिध्दी देवून गरजु लाभार्थ्याचे अर्ज मागवुन लाभार्थी निवड करणे आवश्यक आहे परंतु सदरील कार्यवाही झालेली नाही, त्यामुळे साहित्याचे वाटप त्या त्या आर्थिक वर्षात झालेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक मागास 1089/ दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीचे मास्टर रजिष्टर तालुका निहाय ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्रमाणक क्रमांक 41 /33 दिनांक 17 जानेवारी 2001 व दिनांक 20 जुन 2008 नुसार लाभार्थ्याची निवड 31 जुलै पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असताना तरतुदीनुसार निवड प्रक्रीया केलेली नाही.

**3.660 कास्टींग संच व डवरा संच खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी कास्टींग संच व डवरा संच खरेदीवर रुपये 7,33,200/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागणी केली असताना पुरवठादाराने न्युमॅट्रीक स्प्रे/डस्टर व डवरा पुरवले नाही. मार्गदर्शक सुचनेप्रमाणे 3% दंड कास्टींग संच पुरवठादाराकडुन रुपये 50,760/- वसुल करणे अपेक्षीत होते. तसेच अडजस्टेबल वखर पुरवठादाराकडुन देखिल 3 % दंड रुपये 21,996/- वसुलपात्र ठरते.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक 1098/प्र.क्र. 73/34, दिनांक 20/10/1999 नुसार योजनेची व्यापक प्रसिध्दी देवून गरजु लाभार्थ्याना अर्ज मागवुन लाभार्थी निवड करणे आवश्यक आहे परंतु सदरील कार्यवाही झालेली नाही, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक मागास 1089/ दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीचे मास्टर नोंदवही तालुका निहाय ठेवलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र. 41 /33 दिनांक 17 जानेवारी 2001 व दिनांक 20 जुन 2008 नुसार वेळापत्रकाचे पालन करुन निवड प्रक्रीया केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक स.क्र.औ 2011/प्र.क्र. 31/11 ए दिनांक 22/11/2011 अन्वये आवश्यकता नसताना मागणी नोंदवु नये असे असताना औजारे विनावाटप पडुन आहेत. म्हणजे आवश्यकता नसताना खरेदी केल्याचे दिसते.

**3.661 जिल्हा परिषद स्व-उत्पन्नातुन 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबा कुटी पुरवठा करणेच्या योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण दरम्यान जिल्हा परिषद स्वउत्पन्नातुन 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबाकुट्टी पुरवठा करणेच्या योजनेमध्ये पुढील प्रकारच्या अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेच्या योजना राबविताना विहित वेळापत्रका प्रमाणे लाभार्थी निवड खरेदी प्रक्रीया व वाटप होणे आवश्यक असताना वेळापत्रकाची दखल घेण्यात आली नाही. तसेच लाभार्थी निवडी शिवाय खरेदी करण्यात आली.

2) लाभार्थीचे लाभा बाबत गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल झाल्या शिवाय योजना कार्यान्वीत करु नये असे आदेश असताना लाभार्थी हिस्सा जमा न करता केवळ मंजूर तरतुदी मधुन खर्च केला आहे

4) योजने अंतर्गत पुरविलेल्या अवजारांचा विनियोग व लाभार्थी आर्थिक स्थिती सुधारले बाबतचा अहवाल संचिकेमध्ये आढळून आला नाही

5) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक 28/11/2011 चे मार्गदर्शक सुचना नुसार 11-ड (2) अन्वये रुपये 10,000/- पेक्षा कमी किमतीचे अवजाराकरीता एकुण पुरवठा संख्येच्या 2.5 टक्के रॅन्डम पध्दतीने नमुने क्षेत्रिय स्तरावर कृषि विद्यापीठ किंवा शासकीय अभियांत्रिकी संस्थे कडुन तपासले नाही.

6) पंचायत समिती, जिंतुर व पुर्णा चे लोकवाटा वसुली व भरणा इत्यादी बाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 1.4 (अ) मधील क्रमांक 2 प्रमाणे प्राधान्यक्रमाचा विचार करुन लाभार्थी निवड केली असल्या बाबत अभिलेख्यां अभावी पडताळणी करता आली नाही.

**3.662 विशेष घटक योजने अंतर्गत मागास शेतकऱ्यांना शेती उपयोग साहित्याचे पुरवठा करणे बाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** कृषी विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी सन 2014-15 मध्ये 186 तुषार संच, 186 पॉवर स्प्रे व 186 विद्यूत पंप व डिझल इंजिन खरेदी करुन मागास लाभार्थ्यांना वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मागदर्शक सुचना दिनांक 03/05/2014 मधील अनुक्रमांक 5 (अ) नुसार या योजनेची माहिती सर्व शेतकरी यांना व्हावी यासाठी जिल्हा स्तरावर कृषि विकास अधिकारी यांनी व तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांनी व्यापक प्रमाणात जिल्हा व तालुका पातळीवर प्रसिध्दी दिल्याचे आढळुन आले नाही. तसेच निवड केलेल्या लाभार्थ्यांची माहिती ग्राम सभेत दिल्याची अभिलेखे संचीकेत उपलब्ध नाही.

2) संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मागदर्शक सुचना दिनांक 03/05/2014 मधील मागदर्शक सूचना क्रमांक 6.2 नूसार या योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणेमार्फत करून घ्यावयाचे असल्याने योजनेतील लाभार्थी व त्यांना दिलेले लाभ याबाबत सन 1982-83 पासूनची माहीती, लाभार्थ्यांच्या याद्या, दिलेले लाभ व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी. तथापि अशी कार्यवाही केल्याचे अभिलेख्यांवरून दिसून येत नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 प्रमाणे योजना राबविण्याचे वेळापत्रक पाळले नाही.

4) संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना दिनांक 03/05/2014 मधील मार्गदर्शन सूचना क्रमांक 6.5 नुसार महिला लाभार्थ्यांना प्राधान्य व 6.6 अनुसार एकुण मंजुर निधी पैकी 3 टक्के निधी अनुसुचीत जातीतील अपंग शेतकऱ्यांना लाभ दिल्याचे अभिलेखे संचीकेत उपलब्ध नाही.

5) सदरचे साहित्य दर करार महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुक्रऔ-2013/प्र.क्र.158/11-अ,दिनांक 27/09/2013 मधील मुद्दा क्रमांक 19 अन्वये शासकीय योजनांतर्गत पूरवठयासाठी निश्चित केलेल्या औजाराचे दर त्याच औजाराच्या खूल्या बाजारातील दरापेक्षा तूलनेने जास्त आढळल्यास, अशा औजारांच्या किमतीइतकी रक्कम संबंधित पूरवठा संस्थेकडून वसूल करण्यात येवून त्याबाबत दंडात्मक कारवाई करण्यात येईल. परंतू, पूरवठा केलेले औजाराचे दर खूल्या बाजारातील त्या औजारांच्या दराशी तूलना केलेबाबत अभिलेख्यांवरून दिसून येत नाही.

6) संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदशक सुचना दिनांक 03/05/2014 परिच्छेद 14 नुसार योजनेची तपासणी प्रपत्र 2-अ नमुन्यात होणे आवश्यक आहे मात्र हा तपासणी अहवाल संचिकेत उपलब्ध नाही.

7) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुक्रऔ-2013/प्र.क्र.158/11-अ, दिनांक 27/09/2013 मधील मुद्दा क्रमांक 10 नूसार औजाराचे केंद्रीय तपासणी संस्थांचे/कृषि विद्यापीठांचे तपासणी अहवालाची अथवा बीआयएस प्रमाणपत्राची प्रत औजारांची मागणी नोंदविणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देणे पूरवठा संस्थांवर बंधनकारक राहील तसेच औजारांचा पूरवठा पूर्व गूणवत्ता

तपासणी अहवाल दिल्याशिवाय पूरवठा संस्थेने औजारांचा पूरवठा करू नये असे असतांना अशा प्रकारची कार्यवाही केल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरून दिसून येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय सुक्रऔ-2013/प्र.क्र.158/11-अ, दिनांक 27/09/2013 मधील मुद्दा क्रमांक 11 अन्वये गुणवत्तापूर्ण कृषि औजारांचा पूरवठा व्हावा, यासाठी क्षेत्रीय स्तरावर रँण्डम पध्दतीने काढलेल्या औजारांच्या नमून्यांची गूणवत्ता तपासणी कृषि विदयापीठे/शासकीय अभियांत्रिकी यांचेकडून करून घेतलेबाबत अभिलेखे संचिकेत उपलब्ध नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 83 (3) नुसार साहित्य खरेदी पुर्वी व नियम 79 प्रमाणे साहित्य खरेदी नंतर योग्य सक्षम अधिकारी यांचे कडुन तपासणी झाल्याचे आढळून आले नाही.

10) सदर शासन निर्णय दिनांक 07/07/2014 सोबतचे परिशिष्ट 3 मधील (दहा) नूसार लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या बाबवार अर्थसहाय्याची योजना निहाय, बाबनिहाय व लाभार्थी निहाय नोंद करण्याकरीता पंचायत समिती स्तरावर रजिस्टर ठेवण्यात यावे व त्यामध्ये लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनूदानाची बाबनिहाय नोंद ठेवण्यात यावी. तसेच कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांची नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदरील नोंदवहया लेखापरीक्षणास दर्शविण्यात आल्या नाहीत.

11) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4-अ, दिनांक 07/07/2014 मधील परीच्छेद क्रमांक (तेरा) नूसार या योजनेचे मासिक प्रगती अहवाल विहीत केलेल्या प्रपत्रात प्रत्येक महिन्याचे 5 तारखेपर्यंत कृषि आयूक्तालयास पाठविणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

12) पंचायत समिती स्तरावरील जिंतूर व पूर्णा येथील लोकवाटा वसूली व भरणा बाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

13) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4अ,दिनांक 07/07/2014 मधील 7 नुसार शासनास योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल सादर केलेबाबत संचिकेत अभिलेखे उपलब्ध नाही.

14) शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 1.4 (अ) मधील क्रमांक 2 प्रमाणे प्राधान्य क्रमाचा विचार करुन लाभार्थी निवड केली असल्या बाबत अभिलेख्यावरुन पडताळणी करता आली नाही.

**3.663 उर्जा कार्यक्षम पथदिवे खरेदी व ग्रामपंचायतींना पूरवठा करणे या योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण दरम्यान उर्जा कार्यक्षम पथदिवे खरेदी व ग्रामपंचायतींना पूरवठा करणे या योजने अंतर्गत रक्कम रूपये 41,06,695/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे उर्जा कार्यक्षम पथदिवे खरेदी करण्यापूर्वी ग्रामपंचायतीची मागणी किंवा ग्रामपंचायतीस पथदिव्यांची असलेली आवश्यकता इत्यादी बाबत ग्रामपंचायत अहवाल संचिकेत उपलब्ध नाही.

2) सदरचे खरेदी केलेले साहीत्याच्या किंमती व दर्जाच्या अनूषंगाने खूल्या बाजारातील पथदिव्यांच्या किंमतीपेक्षा जास्त असणार नाही, याची खात्री करून पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येत नाही.

3) 5 ग्रामपंचायतींमध्ये उर्जा कार्यक्षम पथदिवे पोहोच पावतीवर साहित्य स्विकारण्याचे नाव व शिक्का नाही.

4) महाराष्ट् जिल्हा परिषद व पंचयात समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (3) अन्वये साहित्या खरेदी पूर्वी व खरेदी नंतर नियम 79 अन्वये साहीत्याची तपासणी करुन प्रमाणपत्रा नोंदविल्याचे आढळुन आलेले नाही.

5) सदरचे ऊर्जा कार्यक्षम पथदीवेची नोंद ग्रामपंचायतीचा साठा नोदवहीत घेतल्याचे आढळुन आलेले नाही.

**3.664 जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 50 टक्के अनुदानावर पिकसंरक्षण उपकरणे पावर स्प्रेपंप कमडस्टर खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद उपकराअंतर्गत 50 टक्के अनुदानावर पिक संरक्षण उपकरणे पावर स्प्रेपंप कमडस्टर खरेदीसाठी रूपये 12,49,500/- व 50 टक्के लाभार्थी हिस्सा यानुसार 490 लाभधारकांना रूपये 5,100/- किमतीचे पावर स्प्रेपंप पंचायत समिती निहाय वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/प्र.क्र.114/38 दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी सर्वसाधारण सभेत लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश देण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57,दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95,दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे साहित्याची खरेदीपूर्वी लाभार्थी निवड केली नसुन परिच्छेद 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतून पडली.

4) उपरोक्त योजनेच्या संचिकेची तपासणी केली असता लाभार्थ्यांचे मागणी अर्ज प्रस्ताव, लाभार्थी निवडीचे निकष, 3 टक्के अपंग लाभधारकांना लाभ, लाभधारकाकडून लाभार्थी हिस्सा रक्कम जमा केल्याबाबत पावती पुस्तके लेखापरीक्षणास दर्शवलेली नाही. सदर लाभार्थ्यांना विषय समितीची मान्यता असल्याबाबत विषय समिती कार्यवृत्तांत नोंदवही सादर न केल्याने तपासणी करता आली नाही. त्यामुळे निवड यादीतील लाभधारकांना लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

5) दरकरार मार्गदर्शक सूचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद क नुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रगतीशील शेतकरी यांच्या समितीच्या अभिप्रायानंतरच साहित्याचे वाटप करुन लाभधारकाकडून औजारे व साहित्य सुस्थितीत मिळाल्याचे लेखी घेतल्याचे दिसुन येत नाही.

6) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि़-5/2013, दिनांक 04/10/2013 नुसार अ) औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत घेतली नाही.

ब) 45 दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा संस्थेची असताना 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड रक्कम रूपये 74,970/- वसुल न करता माल ताब्यात मिळाल्याच्या दिनांकात खाडाखोड करुन विलंब दंड टाळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते. क)एकूण पुरवठा संख्येच्या 2.5 टक्के नमुने क्षेत्रिय स्थरावर काढून कृषी विद्यापीठे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांकडून पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. तसेच पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10 टक्के रक्कम राखून न ठेवता संपुर्ण प्रदान केले.

7) पावर स्प्रेपंप पंचायत समितीना प्राप्त झाले असुन पंचायत समिती सेनगाव आणि कळमनुरी यांच्या डिलेवरी चलन वर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

**3.665 जिल्हा परिषद उपकराअंतर्गत सुधारित कृषी औजारे लोखंडी वखर पुरवठा खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद उपकराअंतर्गत सुधारीत कृषि अवजारे लोखंडी वखर खरेदीसाठी रूपये 14,00,000/- खर्च नोंदवून पंचायत समिती निहाय वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेड.पी.ए.-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रकाबाबत योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/प्र.क्र. 872/जल 2 ब, दिनांक 10/10/1996 अन्वये किती साहित्याची आवश्यकता आहे याची एकत्रित मागणीचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही न केल्याने वर्ष अखेर मोठया प्रमाणात साहित्य विनावाटप पडून होते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/प्र.क्र.114/38 दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी साहित्याची खरेदी करण्यापूर्वी सर्वसाधारण सभेत लाभार्थ्यांची निवड न करता पंचायत समितीनिहाय साहित्याचा संख्यात्मक पुरवठा आदेश देण्यात आला.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापूर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95, दिनांक 09/10/1997 मधील परिच्छेद क्रमांक 3 प्रमाणे साहित्याची खरेदीपुर्वी लाभार्थी निवड केली नसुन परिच्छेद 5 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करणे आवश्यक असताना वित्तीय वर्ष अखेरही साहित्य विनावाटप पडून असल्याने जिल्हा परिषदेची रक्कम विनाकारण गुंतून पडली.

6) योजनेच्या संचिकेची तपासणी केली असता लाभार्थ्याचे मागणी अर्ज प्रस्ताव, लाभार्थी निवडीचे निकष, 3 टक्के अपंग लाभधारकांना लाभ, लाभधारकाकडुन लाभार्थी हिस्सा रक्कम जमा केल्याबाबत पावती पुस्तके लेखापरीक्षणास दर्शवलेली नाही. सदर लाभार्थ्यांना विषय समितीची मान्यता असल्याबाबत विषय समिती कार्यवृत्तांत नोंदवही सादर न केल्याने तपासणी करता आली नाही. त्यामुळे निवड यादीतील लाभधारकांना लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

7) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 दरकरार मार्गदर्शक सूचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद क नुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रगतीशील शेतकरी यांच्या समितीच्या अभिप्रायानंतरच साहित्याचे वाटप करुन लाभधारकाकडून औजारे व साहित्य सुस्थितीत मिळाल्याचे लेखी घेतल्याचे दिसुन येत नाही.

8) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद इ नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत घेतली नाही.

9) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय-सुकृऔ-2013/प्र.क्र.158/11, दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक 8 नुसार आणि मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-1 नुसार मागणी केलेली औजारे यांच्या मागणीनंतर 45 दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा संस्थेची असताना 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड रक्कम रूपये 87,000/- वसुल न करता माल ताब्यात मिळाल्याच्या दिनांकात खाडाखोड करुन विलंब दंड टाळण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

10) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार दिनांक 27/09/2013 सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्र. 11 नुसार रूपये 10,000/- पेक्षा कमी किंमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 2.5 टक्के नमुने क्षेत्रिय स्तरावर काढून कृषी विद्यापीठे/ शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्याकडून पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. वरील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद (ग) नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक 15 नुसार पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10 टक्के रक्कम राखून न ठेवता संपुर्ण प्रदान केले.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा उद्देश सफल झाला किंवा नाही याबाबत सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसुन आलेला नाही.

**3.666 विशेष घटक योजने अंतर्गत वाटप केलेल्या डिझेल पंप, ओपन वेल पंपसेट वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** कृषि विभाग, जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजनेतून डिझेल पंप, ओपन वेल पंपसेट खरेदीवर रूपये 40,24,000/- खर्च नोंदविला असुन पंचायत समिती निहाय वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्रमांक विप्र/07/विघयो/अंतरिम/मासु/14-15/459/14, दिनांक 31/05/2014 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्र. झेड.पी.ए.-2008/प्र.क्र.446/वित्त-9, मंत्रालय, मुंबई,दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद (इ) नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत घेतली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. मागास-1083/प्र.क्र.1239/34, मंत्रालय, मुंबई दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थी नोंदवही ठेवली नाही.

4) विशेष घटक योजने अंतर्गत सन 2013-14 मध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची निवडयादी व प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

5) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतरिम मार्गदर्शक सूचना जा.क्र. क्र.वि.प्र./07/ वि.घ.यो./अतरीम/मासु/14-15/459/14, दिनांक 31/05/2014 मधील 6.2 ते 6.9 नुसार विभागाने त्रयस्त यंत्रणेमार्फत योजनेचे मुल्यमापन, योजनेचा फलश्रुती अहवाल, यशोगाथा व इतर बाबी नुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

6) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार योजनेअंतर्गत निवड झालेले लाभार्थी अर्थसहायाचा दुरुपयोग करणार नाही यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी तपासणी केल्याचे अहवाल दर्शविले नाही.

7) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांचे नोंदवही ठेवली नसुन लाभार्थी नोंद पुस्तिका लाभार्थ्यांना दिल्याचे दिसुन आले नाही. याच मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्रमांक 14 नुसार विहीत प्रपत्र 2 अ नमुन्यात विभागीय कृषी सहसंचालक, कृषी विकास अधिकारी आणि इतर अधिका-यांचे विहीत टक्केवारी नुसार तपासणी करण्यात आली नाही.

8) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद क नुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रगतीशील शेतकरी यांच्या समितीच्या अभिप्रायानंतरच साहित्याचे वाटप करुन लाभधारकाकडून औजारे व साहित्य सुस्थितीत मिळाल्याचे लेखी घेतले नाही.

9) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-1 नुसार मागणी केलेली औजारे यांच्या मागणीनंतर 45 दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा संस्थेची असताना 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड रक्कम रूपये 62,400/- वसुल केलेला नाही.

10) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार रूपये 10,000/- ते रूपये 50,000/- किमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 1.5 टक्के नमुने क्षेत्रिय स्तरावर काढून कृषी विद्यापीठे / शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांकडून पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. वरील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद ग नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक

15 नुसार पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10 टक्के रक्कम राखून न ठेवता संपुर्ण प्रदान केले.

**3.667 विशेष घटक योजना खर्चातील अनियमिततेबाबत. HDP ताडपत्री PVC पाईप.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, कृषि विभाग हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजनेतुन नमुद प्रमाणकानुसार रूपये 52,07,660/- शेती अवजारे HDP ताडपत्री PVC पाईप खरेदी केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्रमांक विप्र/07/विघयो/अंतरिम/मासु/14-15/459/14, दिनांक 31/05/2014 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्र. झेड.पी.ए.-2008/प्र.क्र.446/वित्त-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद इ नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत घेतली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/प्र.क्र.1239/ 34, मंत्रालय, मुंबई, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थी नोंदवही ठेवली नाही.

4) विशेष घटक योजने अंतर्गत सन 2013-14 मध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची निवडयादी व प्रस्ताव लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

5) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतरिम मार्गदर्शक सूचना जा.क्र. क्र.वि.प्र./07/ वि.घ.यो./अतरीम/मासु/14-15/459/14,दिनांक 31/05/2014 मधील 6.2 ते 6.9 नुसार विभागाने त्रयस्त यंत्रणेमार्फत योजनेचे मुल्यमापन, योजनेचा फलश्रुती अहवाल, यशोगाथा व इतर बाबी नुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

6) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार योजनेअंतर्गत निवड झालेले लाभार्थी अर्थसहायाचा दुरुपयोग करणार नाही यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी तपासणी केल्याचे अहवाल दर्शविले नाही.

7) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांचे नोंदवही ठेवली नसुन लाभार्थी नोंद पुस्तिका लाभार्थ्यांना दिल्याचे दिसुन आले नाही. याच मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्रमांक 14 नुसार विहीत प्रपत्र 2अ नमुन्यात विभागीय कृषी सहसंचालक, कृषी विकास अधिकारी आणि इतर अधिका-यांचे विहित टक्केवारी नुसार तपासणी करण्यात आली नाही.

8) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद क नुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रगतीशील शेतकरी यांच्या समितीच्या अभिप्रायानंतरच साहित्याचे वाटप करुन लाभधारकाकडून औजारे व साहित्य सुस्थितीत मिळाल्याचे लेखी घेतले नाही.

9) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-1 नुसार मागणी केलेली औजारे यांच्या मागणीनंतर 45 दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा संस्थेची असताना 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड रक्कम रूपये 21,935/- वसुल केलेला नाही.

10) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार रूपये 10,000/- ते रूपये 50,000/- किमतीच्या औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या 1.5 टक्के नमुने क्षेत्रिय स्तरावर काढून कृषी विद्यापीठे/शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांकडून पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. वरील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद ग नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार सोबतचे प्रपत्र 2 मधील

परिच्छेद क्रमांक 15 नुसार पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10 टक्के रक्कम राखून न ठेवता संपुर्ण प्रदान केले.

**3.668 विशेष घटक योजने अंतर्गत लोखंडी बैलगाडी व पावर स्प्रेपंप वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद, कृषि विभाग, हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजनेतून नमुद प्रमाणकानुसार रूपये 10,28,200/- शेती अवजारे खरेदी केलेली असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्रमांक विप्र/07/विघयो/अंतरिम/मासु/14-15/459/14, दिनांक 31/05/2014 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्र. झेड.पी.ए.-2008/प्र.क्र.446/वित्त-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक असताना यानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे मार्गदर्शक सूचना सुकृऔ/दरनि-2013-14/152/गुनि़-5/2013, दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद इ नुसार औजाराचा प्रकार, अनुक्रमांक, उत्पादक/पुरवठादाराचे नाव, उत्पादन वर्ष, पुरवठा पूर्व/पुरवठा पश्चात तपासणी अहवाल बाबींची नोंद साठा/वाटप नोंदवहीत घेतली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग़, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/ प्र.क्र.1239/34, मंत्रालय, मुंबई दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थी नोंदवही ठेवली नाही.

4) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतरिम मार्गदर्शक सूचना जा.क्र. क्र.वि.प्र./07/ वि.घ.यो./अतरीम/मासु/14-15/459/14, दिनांक 31/05/2014 मधील 6.2 ते 6.9 नुसार विभागाने त्रयस्त यंत्रणेमार्फत योजनेचे मुल्यमापन, योजनेचा फलश्रुती अहवाल, यशोगाथा व इतर बाबी नुसार कार्यवाही केल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

5) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 10 नुसार योजनेअंतर्गत निवड झालेले लाभार्थी अर्थसहायाचा दुरुपयोग करणार नाही यासाठी योजना राबविणा-या अधिका-यांनी तपासणी केल्याचे अहवाल दर्शविले नाही.

6) उपरोक्त मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 मधील परिच्छेद क्रमांक 11 नुसार जिल्हा कृषी अधिकारी (विघयो) यांनी जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभ घटकांचे नोंदवही ठेवली नसुन लाभार्थी नोंद पुस्तिका लाभार्थ्यांना दिल्याचे दिसुन आले नाही. याच मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्रमांक 14 नुसार विहीत प्रपत्र 2अ नमुन्यात विभागीय कृषी सहसंचालक, कृषी विकास अधिकारी आणि इतर अधिका-यांचे विहीत टक्केवारी नुसार तपासणी करण्यात आली नाही.

7) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद क नुसार जिल्हा आणि तालुका स्तरावर अधिकारी, लोकप्रतिनिधी व प्रगतीशील शेतकरी यांच्या समितीच्या अभिप्रायानंतरच साहित्याचे वाटप करुन लाभधारकाकडून औजारे व साहित्य सुस्थितीत मिळाल्याचे लेखी घेतले नाही.

8) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-1 नुसार मागणी केलेली औजारे यांच्या मागणीनंतर 45 दिवसांच्या आत पुरवठा करण्याचे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा संस्थेची असताना 45 दिवसानंतर पुरवठा केलेल्या औजारांच्या किंमतीच्या 3 टक्के दंड रक्कम रूपये 29,565/- वसुल केलेला नाही.

9) मार्गदर्शक सुचना दिनांक 04/10/2013 मधील परिच्छेद ड-2 नुसार औजारांच्या एकूण पुरवठा संख्येच्या प्रमाणात नमुने क्षेत्रीय स्थरावर काढून कृषी विद्यापीठे/शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांकडून पुरवठा पश्चात क्षेत्रीय तपासणी केल्याचे आढळुन आले नाही. वरील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद ग नुसार आणि उपरोक्त नमुद दरकरार सोबतचे प्रपत्र 2 मधील परिच्छेद क्रमांक 15 नुसार पुरवठा पश्चात क्षेत्रिय तपासणी अहवाल नसताना पुरवठादाराची 10टक्के रक्कम राखून न ठेवता संपुर्ण प्रदान केले.

**3.669 50 टक्के व 100 टक्के अनुदानावर प्लास्टीक ताडपत्री खरेदी करुन पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2 व 5) -** सन 2014-2015 या कालावधीचे कृषी विभाग, जिल्हा परिषद नांदेडने 50 टक्के अनुदानावर खरेदीकरीता रक्कम रुपये 24,99,552/- व 100 टक्के अनुदानावर खरेदीकरीता 2,16,92,564/- असा एकूण रुपये 2,41,92,106/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/ नियम-09,दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परीषद स्तरावर योजना राबविण्यासाठी अंमलबजावणी विहीत वेळापत्रकानुसार निश्चीत केली आहे. त्यानुसार प्रशासकीय व तांत्रीक मान्यतेनंतर लाभार्थीची निवड करून, लोकवाटा जमा करून पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. (परिच्छेद क्रमांक 2)

2) योजनेच्या अट क्रमांक 03 अन्वये अनुदानावर ताडपत्री वाटपाच्या वेळी अल्प भुधारक व मागासवर्गीय शेतक-यांना प्राधान्य देण्यात येईल असे नमुद असताना संचीकेची तपासणी केली असता सदरील लाभ धारकाचे अल्प भुधारक व मागासवर्गीय बाबतचे लेखे व अभिलेखे संचीकेत आढळुन आले नाही. त्यामुळे प्राधान्य दिले किंवा नाही याचा बोध होत नाही. (परिच्छेद क्रमांक 2)

3) साठा नोंदवहित पंचायत समिती स्तरावर साहित्य प्राप्त व लाभ धारकाला वाटप नमूद नाही. (परिच्छेद क्रमांक 2)

4) मार्गदर्शक सुचना 31/05/2014 अन्वये योजनेची अंमलबजावणी मुल्यमापन त्रयस्थ संस्थेकडुन होणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केली नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

5) पंचायत समिती स्तरावर कृषी गोडावुन साठा नोंदवहीवर साहीत्य जमा व वाटपा बाबत गटविकास अधिका-याच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

6) कृषी संचालक, जिल्हा गुणनियंत्रण कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 नुसार लाभार्थी योजनेचे बाबत भेट नोंदवही ठेवण्यात आली नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

7) दरकारान्वये औजाराचे पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वाटप केलेली औजारे समाधानकारक व भोगोलीक दृष्टया उपयुक्त असल्याबाबत खात्री करुन मागणी नोंदविणा-या अधिका-यांनी देयकाची 90 टक्के रक्कम 30 दिवसात संस्थेस अदा करावे व उर्वरीत 10 टक्के रक्कम पुरवठा पश्चात क्षेत्रीय स्तरावर रॅण्डम पध्दतीने गुणवत्ता तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर तसेच संबंधीत औजाराबाबत काही तक्रार असल्यास त्या तक्रारीचे निवारण केल्यानंतरच संबंधीत संस्थेस रक्कम अदा करावी. असे स्पष्ट दरपत्रकात नमुद असतांना देखील 100 टक्के रक्कम प्रदान करण्यात आली आहे. (परिच्छेद क्रमांक 5)

8) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक -विघयो/1611/प्र.क्र.4/112(ए),दिनांक 03/06/2011 चे परीशीष्ट दोन (4) प्रमाणे सदरील योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी पाच वर्षापर्यंत या योजनेचा पुनश्च लाभ घेऊ शकणार नाहीत. त्यासाठी उक्त महाराष्ट्र शासन निर्णय परीशीष्ट तीन प्रमाणे पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवण्यात आली नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

9) पंचायत समिती हदगावच्या साठा नोंदवहीची तपासणीत 05 ताडपत्री वाटप केलेली नाही. (परिच्छेद क्रमांक 5)

**3.670 शेतक-यांना पॉवरस्प्रे खरेदी करुन पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 या कालावधीचे कृषी विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 1,33,33,280/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446 / नियम-09,दिनांक 20/06/2008 नुसार योजना विहीत वेळापत्रकानुसार राबविण्यात आली नाही.

2) मार्गदर्शक सुचना 31/05/2014 अन्वये योजनेचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थेकडून होणे आवश्यक होते. अशी कार्यवाही केली नाही.

3) मार्गदर्शक सुचना 31/05/2014 अन्वये लाभार्थी योजनेचा योग्य वापर करत असल्याची भेटी बाबत नोंदवही ठेवण्यात आली नाही.

4) मार्गदर्शक सुचना दिनांक 31/05/2014 अन्वये कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) 100 टक्के जिल्हा कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) सर्व पंचायत समिती समप्रमाणात 10 टक्के कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद सर्व पंचायत समिती मध्ये 05 टक्के कृषी आयुक्तालय 0.75 टक्के या प्रमाणे तपासणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) मार्गदर्शक सुचना 31/05/2014 अन्वये या योजनेची माहिती सर्व शेतकरी बांधवाना व्हावी याकरीता व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) पंचायत समितीच्या नोंदवहीची तपासणी केली असता पॉवरस्प्रेचे सात नग शिल्लक आढळुन आले आहेत.

7) दरकरान्वये औजारांचे पुरवठा पुर्व गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यांनतर व लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वाटप केलेली औजारे समाधानकारक व भौगोलीकदृष्टया उपयुक्त असल्याबाबत खात्री करुन मागणी नोंदविण्या देयकांची अधिका-यांना या 90 टक्के रक्कम 30 दिवसात पुरवठा संस्थेस अदा करावी. उर्वरीत 10 टक्के रक्कम पुरवठा पश्चात क्षेत्रीयस्तरावर रॅण्डम पध्दतीने काढलेल्या नमुन्यांच्या गुणवत्ता तपासणीचे अहवाल प्राप्त झाल्यांनतर तसेच संबंधित औजारांबाबत काही तक्रार असल्यास ज्या तक्रारीचे पुर्णत: निवारण केल्यानंतरच संबंधित पुरवठा संस्थेस अदा करावी असे दरकरारात नमुद असताना देखिल 100 टक्के अदा करण्यात आली आहे.